नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २८९ | किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




सोमवार, दि. ०५ ऑक्टोबर २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# एसआयआर रद्द करा!

## मतपत्रिकांवर पुन्हा निवडणुका घेण्याची विरोधकांची मागणी

मुंबई : (स. गांवकरी)

महाराष्ट्रासह देशभर राबविल्या जाणाऱ्या मतदार याद्यांची 'विशेष सखोल फेरतपासणी' (एसआयआर) ही मोहीम बेकायदेशीर असून ती संपूर्णपणे रद्द करण्यात यावी, तसेच निवडणुका मतपत्रिकेवर पुन्हा घेण्याची मागणी मनसेचे प्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी गर्जना मोर्चाच्या वेळी केली. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी तसेच मतदार याद्यांच्या विशेष सखोल फेरतपासणी मोहिमेच्या विरोधात उद्धव ठाकरे व राज ठाकरे यांनी आयोजित केलेल्या गर्जना मोर्चात काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार), शेकाप, डावे पक्ष सहभागी झाले होते.

मेट्रो सिनेमागृहापासून ते महानगरपालिकेपर्यंत हा मोर्चा निघाला. मुंबई महापालिकेसमोर उभारण्यात आलेल्या व्यासपीठावर झालेल्या जाहीर सभेत निवडणूक आयोगाच्या विरोधात एकमुखी आवाज दुमदुमला. कुठल्याही पक्षाचा झेंडा किंवा चिन्ह न घेता केवळ तिरंगा आणि पांढऱ्या टोप्या घालून कार्यकर्ते मोर्चात सहभागी झाले होते. महाराष्ट्रातील एसआयआर प्रक्रिया पूर्णपणे



रद्द करण्यात यावी, अशी भूमिका या वेळी सर्व नेत्यांनी घेतली. या वेळी काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात, राष्ट्रवादीचे जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड, शशिकांत शिंदे, शेकापचे जयंत पाटील आदी विरोधी पक्षाच्या नेत्यांबरोबरच शिवसेनेचे सुभाष देसाई, अरविंद सावंत, अनिल परब, मनसेचे अमित ठाकरे, बाळा नांदगावकर आदी नेते उपस्थित होते.

लोकसभेनंतर अवघ्या सहा महिन्यांत झालेल्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात ४० ते ६० लाख मतदार कसे वाढले, असा प्रश्न करत राज ठाकरे यांनी या निकालावरच साशंकता व्यक्त केली. लोकसभेत भाजपला २ कोटी ४४ लाख मते मिळाली होती. ही आकडेवारी विधानसभेला ३.१६ कोटींवर कशी गेली, हा संशोधनाचा विषय आहे. मतदार यादीतील घोळामुळेच २०२४ची विधानसभा निवडणूक भाजप जिंकू शकली, असा आरोप त्यांनी केला.

माजी केंद्रीय गृहसचिव आर. के. सिंह यांच्या वक्तव्याचा हवाला देत राज ठाकरे यांनी, देशभर सरसकट सुरू असलेला 'एसआयआर'च बेकायदेशीर असल्याचा दावा केला. कुणाला सत्तेत बसवायचे आणि कुणाला विरोधात, हे या देशातील मतदार ठरवतील, निवडणूक आयोग नाही, असे स्पष्ट करत राज ठाकरे म्हणाले, एकाच उद्योगपतीला जंगले, जमिनी, विमानतळे, बंदरे देण्यासारखे मनमानी निर्णय सत्ताधारी कुठल्या आत्मविश्वासाच्या बळावर घेत आहेत? निवडणूक आयोगाला दावणीला बांधल्याशिवाय हा विश्वास येणार नाही.

आणि अशीच परिस्थिती राहिली तर या देशातील जनतेने कितीही आंदोलने केली, मोर्चे काढले तरी काही फरक पडणार नाही. सत्तेवर असलेल्या राजकीय पक्षाला सत्ता जाण्याची भीती असते. अशी कोणतीही भीती महाराष्ट्रात अथवा दिल्लीत भाजपला दिसत नाही. कारण निवडणूक आयोग त्यांच्या पाठीशी असल्याचा आरोप ठाकरे यांनी केला.

तुमचे हिंदुत्ववादी सरकार नक्की कुठे आहे, असा सवाल करत त्यांनी प्रशासकीय संस्था ताब्यात घेतल्या तरी उद्या सत्ताधाऱ्यांना रस्त्यावर फिरणे मुश्कील होईल, असा इशारा दिला. महाराष्ट्रातील मराठी माणूस, शेतकरी आणि जनतेचा घात करणारा हा बेकायदेशीर 'एसआयआर' प्रकार तातडीने रद्द करण्याची मागणी करत, मतांची चोरी करणाऱ्यांना जनता सत्तेवरून खेचून खाली आणल्याशिवाय राहणार नाही, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

## हुकूमशाहीला इथल्या मातीत गाडू : उद्धव ठाकरे

उद्धव ठाकरे यांनी भाजपवर हल्लाबोल करत, महाराष्ट्राची जनता या हुकूमशाहीला इथल्या मातीत गाडल्याशिवाय शांत बसणार नाही, असा इशारा दिला. सध्याचे सरकार प्रशासन चालवण्याऐवजी केवळ सूड उगवण्याचे राजकारण करत आहे. आणि त्यासाठी केंद्रीय यंत्रणांचा गैरवापर केला जात आहे. सत्तेच्या मोहात अंध होऊन जनतेच्या अधिकारांवर डल्ला मारणाऱ्यांनी हिटलरचा इतिहास विसरू नये, असा टोला लगावत, बळाचा वापर करणाऱ्या हिटलरला शेवटी स्वतःच्याच कृतीमुळे जगातून नष्ट व्हावे लागले होते, याची आठवण शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपला करून दिली. निवडणूक आयोग आणि मतदार याद्यांमधील घोळावर उद्धव ठाकरे यांनी बोट ठेवले. देशात जिथे जिथे विरोधकांचे बळ वाढते आहे, तिथे तिथे जाणीवपूर्वक मतदारांची नावे गाळण्याचे कारस्थान रचले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. २०१४ मध्ये 'व्होट अगेन्स्ट करप्शन' अशी घोषणा देऊन सत्तेत आलेल्या भाजपविरोधात आता 'इंडिया अगेन्स्ट व्होट चोर' असा नारा देण्याची वेळ आल्याचे उद्धव ठाकरे म्हणाले. राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेच्या मुद्द्यावरून सरकारला धारेवर धरताना उद्धव ठाकरे यांनी, ठाण्यातील पूर्णेकर यांची हत्या आणि देशभरात महिलांवर होणाऱ्या अत्याचारांचा दाखला दिला.

## थोडक्यात...

### वादातून शिक्षकाकडून पोटच्या मुलीचा खून

सातारा (स. गांवकरी) : मोबाईलचा वापर, टीव्ही पाहणे आणि उद्धट वर्तनावरून झालेल्या कौटुंबिक वादातून एका शिक्षक पित्याने रागाच्या भरात १७ वर्षीय मुलीच्या डोक्यात लाकडी बॅटने प्रहार करून तिची हत्या केल्याची धक्कादायक घटना साताऱ्यातील गोडोली परिसरातील स्वराज्यनगर येथे उघडकीस आली आहे. आर्या पुरुषोत्तम कदम (वय १७) असे मृत मुलीचे नाव असून, या प्रकरणी सातारा शहर पोलिसांनी आरोपी पिता पुरुषोत्तम संपत कदम याला अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मूळचे चंचळी (ता. कोरेगाव) येथील रहिवासी असलेले पुरुषोत्तम कदम व त्यांची पत्नी शीला हे दोघेही व्यवसायाने शिक्षक आहेत. त्यांच्या १७ वर्षीय मृत मुलीला चुकीच्या संगतीमुळे उद्धट वर्तनाची सवय लागली होती. कौटुंबिक वाद टाळण्यासाठी पालकांनी तिचे मानसोपचार तज्ज्ञांकडून समुपदेशन व वैद्यकीय उपचारही सुरू केले होते. मात्र, मुलीच्या वर्तनात सुधारणा झाली नव्हती. मे महिन्यातही तिने वडिलांना मारहाण करून जखमी केले होते. शनिवारी रात्री टीव्ही बंद करणे आणि मोबाईल वापरावरून घरात पुन्हा वाद पेटला. रागाच्या भरात मुलीने लहान बहिणीला मारहाण केली. त्यानंतर ती बॅट घेऊन वडिलांच्या अंगावर धावून गेली. या वेळी संतप्त झालेल्या पुरुषोत्तम यांनी तिच्या हातातील बॅट हिसकावून थेट तिच्या डोक्यात मारली. वर्मी बसलेल्या प्रहारामुळे मुलगी जागीच कोसळली.

### खून करणाऱ्या दोघांना जन्मठेप

अलिबाग (स. गांवकरी) : सोन्याची चैन आणि मोबाईल लुटण्याच्या उद्देशाने ६० वर्षीय पांडुरंग लहू भडकले यांचा दगडाने मारहाण करून खून केल्याप्रकरणी दोघांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. पेण तालुक्यातील कांदळेपाडा येथील रोजेश नागू म्हात्रे आणि बारशेतवाडी येथील गोवर्धन सिताराम वाघमारे अशी शिक्षा झालेल्या आरोपींची नावे आहेत. अतिरिक्त सत्र न्यायालय, न्यायाधीश सुनीता तिवारी यांनी हा महत्त्वपूर्ण निकाल दिला. सरकार पक्षातर्फे जिल्हा शासकीय अभियोक्ता ॲड. संतोष पवार यांनी प्रभावी युक्तिवाद केला. मयत पांडुरंग भडकले हे बोरगाव येथील रहिवासी होते. आरोपींनी संगनमत करून त्यांना मोटारसायकलवरून घटनास्थळी नेले. त्यांच्या गळ्यातील सोन्याची चैन आणि खिशातील मोबाईल काढून घेतल्यानंतर चेहरा व डोक्यावर दगडाने मारहाण करून त्यांचा खून केला. त्यानंतर पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह कालव्याच्या पाण्यात टाकून दिला होता.

### मराठवाड्यातून नवरात्रीपूर्वीच स्थलांतर

परभणी (स. गांवकरी) : साखर कारखान्यांच्या गळीत हंगामाला सुरुवात होण्याआधी आणि खरीप हंगाम आटोपल्यानंतर ग्रामीण भागातून रोजगारासाठी स्थलांतर होते. दसरा, दिवाळीच्या पार्श्वभूमीवर मजूर कामासाठी गावाबाहेर पडू लागतात. या नेहमीच्या चित्राला यंदा दुष्काळाने छेद दिला असून, दसरा-दिवाळी आधीच खेड्यापाड्यातून मजुरांचे स्थलांतर होण्यास प्रारंभ झाला आहे. या दिवसांत सोयाबीन काढणे आणि कापूस वेचणीच्या कामाला वेग आलेला असतो. मात्र मराठवाड्यातील ही दोन्ही नगदी पिके हातची गेल्याने मजुरांना कामच उरलेले नाही. सोयाबीन काढणीसाठी एकरी ४ हजार रुपये तर कापूस वेचणीसाठी १० रुपये प्रति किलो, अशी मजुरी आहे. या कामांच्या निमित्ताने किमान महिनाभर शेतमजुरांच्या हाती पैसा खेळतो. या मजुरीच्या पैशावर कुटुंबाचे बरेच नियोजन असते. गावात आता रोजगारच उपलब्ध नसल्याने मजुरांवर स्थलांतराची पाळी आली आहे.

## 'घरातील कोणालाही भाजपचं बटण दाबू देणार नाही : अभिजीत दिपके

पुणे : (स. गांवकरी)

आमच्या घरातल्या आत्या, काकू, मावशी एकाही नातेवाईकाला भाजपचं बटण दाबू देणार नाही... या सरकारमुळे हजारो विद्यार्थ्यांचे वाटोळे झाले... अशा शब्दांत एमपीएससी आंदोलक विद्यार्थ्यांनी आक्रोश व्यक्त केला. कॉकरोच जनता पक्षाचे संस्थापक अभिजीत दिपके यांच्याशी संवाद साधताना विद्यार्थ्यांनी स्पर्धा-परीक्षांच्या तयारीसाठीचा संघर्ष आणि त्यानंतरही पेपरफूटी, आयोगाच्या कारभारामुळे होणाऱ्या नुकसानाचे गाऱ्हाणे मांडले. तर 'सरकारच्या बुद्धीला गंज चढलाच आहे. पण, नागरिकांची बुद्धीही गंजलेलीच दिसते,' अशी टीका दिपके यांनी केली. आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला दिपके यांनी भेट दिली. या वेळी उपस्थित आंदोलकांशी दिपके यांनी संवाद साधत विविध प्रश्नांवर



मार्गदर्शन केले. 'आंदोलनात मुलींची संख्या कमी आहे. मुलांप्रमाणे जास्त वयापर्यंत मुली अभ्यास करू शकत नाहीत. घरातून लग्नासाठी दबाव असतो. इतरही प्रश्न असतात. त्यात पेपरफूटीसारख्या घटनांमुळे आणखी अन्याय होतो. या सगळ्यांना न्याय मिळाला पाहिजे. मुख्यमंत्र्यांनी मुलींच्या या प्रश्नाकडे सकारात्मकपणे बघावे; नाही तर इथे आलेली एकही मुलगी भाजपला मतदान करणार नाही. आमच्या घरातल्या आत्या, काकू, मावशा एकाही नातेवाईकाला भाजपचे बटण दाबू देणार नाही,' अशा शब्दांत आंदोलक विद्यार्थिनीने आक्रोश व्यक्त केला.

## "उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना फोन लावा"

पुणे : (स. गांवकरी)

आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला शिवसेनेचे (शिंदे) खासदार ओमराजे निंबाळकर यांनी भेट दिली. या वेळी आंदोलकांकडून पक्षांतराच्या मुद्यावरून जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. तसेच 'उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना फोन लावा,' अशी मागणीही गर्दीतून करण्यात आली

विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी, त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी आंदोलनस्थळी आल्याचे स्पष्टीकरण खासदार ओमराजे निंबाळकर यांच्याकडून देण्यात आले.

रविवारी रात्री उशिरा त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. "एमपीएससी'च्या अध्यक्षांचा राजीनामा कोणाला घेता येतो?' असा सवालही निंबाळकर यांनी उपस्थित केला. ते म्हणाले, 'आता दोन ठिकाणी आंदोलन सुरू आहे. विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यासाठी इथे आलो आहे. आमदार





रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला निंबाळकर यांनी भेट दिली.

यावेळी आंदोलकांकडून पक्षांतराच्या मुद्यासह घोषणाबाजी करण्यात आली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना फोन लावा, आयोगाच्या अध्यक्षांचा राजीनामा मागा, अशी मागणी गर्दीतून करण्यात आली.

'लोकप्रतिनिधीने पाच वर्षे मेहनत घेतलेली असते. प्रामाणिकपणे, इमानदारीने निवडणूक लढवलेली असते. त्या लोकप्रतिनिधीला पुन्हा लढ म्हटल्यानंतर जितक्या यातना होतात, त्यापेक्षा तुमच्या यातना कितीतरी पटीने अधिक आहेत. पेपरफूटीसारखे पाप करणाऱ्यांना शिक्षा झाली पाहिजे.

अत्यंत संघर्षात ही पोरं अभ्यास करत असतात. अशा परिस्थितीत पेपर रद्द झाला, तर त्यांच्या यातना मी समजू शकतो,' असे ओमराजे निंबाळकर म्हणाले.

दरम्यान, विद्यार्थ्यांनी ओमराजेंसमोर घोषणाबाजी करायला सुरुवात केली. त्यानंतर 'तुम्हाला पाठिंबा द्यायला आलो, चुकलं का? तुमचे विषय मांडायला आलोय, ही चूक झाली का?' अशा शब्दांत ओमराजेंनी संताप व्यक्त केला. या वेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना फोन लावा, राजीनामा मागायचा आहे, अशा मागण्या गर्दीतून करण्यात आल्या.

- खासदार ओमराजे निंबाळकरांसमोर विद्यार्थ्यांची घोषणाबाजी
- ओमराजेंकडूनही प्रतिसाद

"एमपीएससी'च्या अध्यक्षांचा राजीनामा कोणाला घेता येतो? आता दोन ठिकाणी आंदोलन सुरू आहे. विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यासाठी इथे आलो आहे. आंदोलक विद्यार्थ्यांना नेमके काय अपेक्षित आहे, हे समजून त्यांच्या मागण्या सोडविण्यासाठी मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करणार आहे,' असे आश्वासन शिवसेनेचे (शिंदे) खासदार ओमराजे निंबाळकर यांनी दिले.

## पुण्याच्या जागेवरून भाजप, शिंदे गटात वाद

### महायुतीत बेबनाव; शिक्षणसम्राटांच्या नातेवाईकांना विधान परिषदेची उमेदवारी

मुंबई : (स. गांवकरी)

विधान परिषदेच्या पदवीधर व शिक्षक मतदारसंघांतील निवडणुकीवरून सत्ताधारी महायुतीत बेबवान निर्माण झाला आहे. भाजपने तीन उमेदवार जाहीर केले असले तरी पुणे शिक्षक मतदारसंघातून निवडणूक लढविण्याची घोषणा शिवसेना शिंदे गटाने केली. दुसरीकडे, मतांचे गणित जुळविण्यासाठी भाजप व काँग्रेसने शिक्षणसम्राटांची मुलगी वा सुनेला रिंगणात उतरविले आहे. पुणे पदवीधर मतदारसंघातून भाजपने 'पुढारी' वृत्तपत्राचे मालक व मुख्य संपादक प्रतापसिंह जाधव यांची स्नूषा व डी. वाय. पाटील शिक्षण संस्थेचे संचालक पी. डी. पाटील यांची मुलगी डॉ. स्मिता योगेश जाधव यांना उमेदवारी दिली आहे. अमरावती शिक्षक मतदारसंघातून काँग्रेसने माजी मंत्री व 'श्री शिवाजी शिक्षण संस्थे'चे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांची कन्या तर 'देशन्नोती' वृत्तपत्राचे मालक प्रकाश पोहरे यांची सून प्रा. आदिती पोहरे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. दोन्ही शिक्षणसम्राटांच्या मुलींना शिक्षण संस्थेतील मतदार डोळ्यांसमोर ठेवूनच उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. पुणे पदवीधर मतदारसंघात भाजपकडे अनेक इच्छुक होते. पण पक्षात अधिकृतपणे प्रवेश करण्यापूर्वीच स्मिता जाधव यांची उमेदवारी भाजपने जाहीर केली. उमेदवारी जाहीर झाल्यावर जाधव यांचा भाजप प्रवेश झाला. पुणे पदवीधर मतदारसंघात डी. वाय. पाटील शिक्षण संस्थेतील शिक्षकांची मतदार म्हणून मोठ्या प्रमाणावर नोंदणी झाली आहे. भाजपने पाचपैकी तीन मतदारसंघांत उमेदवारांच्या नावांची घोषणा केली. औरंगाबाद पदवीधर हा राष्ट्रवादी अजित पवार गट तर अमरावती शिक्षक मतदारसंघ शिवसेना शिंदे गटासाठी सोडला आहे. भाजपच्या या भूमिकेमुळे महायुतीत नाराजी पसरली. पुणे शिक्षक मतदारसंघातून निवडणूक लढण्याची तयारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निकटवर्तीय मंगेश चिवटे यांनी केली होती. भाजपने उमेदवार जाहीर करताच शिंदे गटाने ही जागा लढण्याचा निर्धार कायम ठेवला. चिवटे हे मंगळवारी पक्षाच्या मंत्र्यांच्या उपस्थितीत अर्ज दाखल करणार आहेत. 'पुणे शिक्षक मतदारसंघातून



शिवसेना निवडणूक लढणार आहे. भाजपने कोणाला उमेदवारी द्यावी हा त्यांचा अंतर्गत प्रश्न आहे', अशी प्रतिक्रिया शिवसेना शिंदे गटाचे नेते व उद्योगमंत्री उदय सामंत यांनी स्पष्ट केले. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या मुदतीपर्यंत तोडगा न निघाल्यास मैत्रीपूर्ण लढत होण्याची चिन्हे आहेत. पुणे शिक्षक मतदारसंघातून पक्षातही फारसे कोणाला परिचित नसलेल्या कौस्तुभ गावडे यांना भाजपने उमेदवारी दिली आहे. गावडे हे कोल्हापूरमधील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. कोल्हापूरमधील अधिक मतदार लक्षात घेता भाजपने पदवीधरप्रमाणेच शिक्षक मतदारसंघातही कोल्हापूरला उमेदवारी दिली आहे.

**भाजपचे तीन उमेदवार :**
**पुणे पदवीधर : डॉ. स्मिता जाधव**
**नागपूर पदवीधर : सुधाकर कोहळे**
**पुणे शिक्षक : कौस्तुभ गावडे**

मतांच्या नोंदणीचे गणित

'कोल्हापूर जिल्ह्यात झालेली सर्वाधिक मतदार नोंदणी लक्षात घेऊन भाजपने 'पुढारी'कार जाधव यांच्या घरात उमेदवारी दिली आहे. स्मिता जाधव या डी. वाय. पाटील यांची नात आहे. 'वडील पी. डी. पाटील हे पुणे व पिंपरी-चिंचवडमधील शिक्षण संस्थेचा कारभार बघतात. याआधी भाजपकडून जाधव यांचे पुत्र योगेश यांची उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली होती.

## स्पर्धा परीक्षांसाठी फक्त दोन वर्षे द्या, आठ-दहा वर्ष वाया घालू नका

### विकास दिव्यकिर्ती यांचा नवा 'फॉर्म्युला'

पुणे : (स. गांवकरी)

स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी आठ – दहा वर्षे यात वाया घालवू नयेत,' असा महत्त्वपूर्ण सल्ला डॉ. दिव्यकीर्ती यांनी दिला. 'परीक्षेची पूर्ण तयारी करण्यासाठी फक्त दोन वर्षे द्या. दोन वर्षे पूर्ण निष्ठेने अभ्यास केल्यानंतर दिवसातून केवळ दोन तास सरावासाठी द्यावेत आणि उरलेल्या वेळेत नोकरी किंवा व्यवसाय सुरू करावा. यामुळे तुमचे वय, कारकीर्द आणि आर्थिक गणित सुरक्षित राहते व मानसिक तणाव येत नाही,' असे दिव्यकीर्ती यांनी स्पष्ट केले. डॉक्टर विकास दिव्य कीर्ती यांची दृष्टी आयएएस या संस्थेची शाखा पुण्यात सुरू होत आहे त्या पार्श्वभूमीवर त्यांनी रविवारी पत्रकारांशी संवाद साधला. 'वेळेवर परीक्षा, भरती न होणे, निकालांचा खोळंबा, न्यायालयात गेलेली प्रकरणे आदींमुळे परीक्षार्थी मानसिक तणावाखाली जात आहेत; त्यामुळे सरकारने तातडीने हस्तक्षेप करून वेळेत निकाल लावावेत आणि विद्यार्थ्यांना हक्काच्या नोकऱ्या द्याव्यात,' अशी अपेक्षा माजी सनदी अधिकारी आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक



डॉ. विकास दिव्यकीर्ती यांनी व्यक्त केली. 'लोकसेवा आयोगाचा कारभार व्यवस्थित करून ठरलेल्या वेळापत्रकानुसारच भरती प्रक्रिया पूर्ण करणे ही पूर्णपणे राज्य सरकारची जबाबदारी आहे,' असेही त्यांनी नमूद केले. 'एमपीएससी'च्या मुख्य परीक्षेच्या स्वरुपाबाबत ते म्हणाले, 'बहुतांश राज्यांमध्ये स्पर्धा परीक्षा वर्णनात्मक स्वरुपाच्या असून, ते अधिक योग्य मानले जाते, राजस्थानात वर्णनात्मकबरोबरच पर्यायी प्रश्नपत्रिका असते. या दोन्हींची सांगड घातली जाते. महाराष्ट्रात राज्य सरकार ज्या पद्धतीचे स्वरुप देईल, त्या प्रमाणे आम्ही शिकवू.'

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी संपादकीय



डॉ. विश्वासराव आरोटे
संपादक - दै. समर्थ गांवकरी

# न्यायासाठी रस्त्यावर येणारा भारतातील तरूण



**शिक्षण हा प्रत्येक विद्यार्थ्याचा अधिकार आहे; मात्र या अधिकारासाठीच विद्यार्थ्यांना रस्त्यावर उतरावे लागत असेल, तर ही केवळ विद्यार्थ्यांची समस्या नसून संपूर्ण शिक्षणव्यवस्थेसमोरील गंभीर प्रश्न आहे.**

भारत हा तरुणांचा देश म्हणून ओळखला जातो. देशाच्या विकासाची स्वप्ने डोळ्यांत घेऊन लाखो विद्यार्थी दरवर्षी शिक्षणाच्या प्रवाहात प्रवेश करतात. चांगले शिक्षण, गुणवत्तापूर्ण सुविधा, पारदर्शक परीक्षा व्यवस्था, योग्य शुल्क आणि भविष्यात रोजगाराची संधी, एवढ्याच त्यांच्या अपेक्षा असतात. परंतु अनेक वेळा या मूलभूत अपेक्षांसाठीही विद्यार्थ्यांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागतो, ही परिस्थिती चिंताजनक आहे. परीक्षांमधील अनियमितता, निकालातील विलंब, शुल्कवाढ, प्रवेश प्रक्रियेतील गोंधळ, वसतिगृहांच्या समस्या, शिष्यवृत्तीचा विलंब, प्रश्नपत्रिकांबाबतचे वाद आणि रोजगाराच्या मर्यादित संधी अशा अनेक प्रश्नांनी विद्यार्थी त्रस्त आहेत. एखाद्या विद्यार्थ्याच्या आयुष्यातील एक वर्ष म्हणजे केवळ बारा महिने नसतात; त्यामागे कुटुंबाचा पैसा, पालकांच्या अपेक्षा आणि विद्यार्थ्याचे भविष्य जोडलेले असते. त्यामुळे शैक्षणिक प्रक्रियेतील प्रत्येक निर्णय अत्यंत जबाबदारीने घेतला जाणे आवश्यक आहे.

विद्यार्थी रस्त्यावर उतरतो तेव्हा त्याकडे केवळ आंदोलन म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. त्या आंदोलनामागे अनेकदा व्यवस्थेकडे पोहोचवलेला असंतोषाचा संदेश असतो. विद्यार्थ्यांच्या तक्रारी ऐकून घेण्यासाठी महाविद्यालयीन आणि विद्यापीठ पातळीवर प्रभावी यंत्रणा असतील, तर प्रश्न चिघळण्यापूर्वीच त्यावर तोडगा काढता येऊ शकतो. संवादाचे मार्ग बंद झाले की रस्ते आंदोलनासाठी खुले होतात. मात्र आंदोलन हाच प्रत्येक समस्येचा अंतिम मार्ग असू नये. विद्यार्थ्यांनीही आपले प्रश्न शांततामय आणि लोकशाही मार्गाने मांडणे गरजेचे आहे. सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान, हिंसाचार किंवा सर्वसामान्य नागरिकांना त्रास होईल अशी भूमिका विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांनाही बाधा आणू शकते. त्यामुळे अधिकारांसोबत कर्तव्याची जाणीवही तितकीच महत्त्वाची आहे.

दुसरीकडे, शासन आणि शिक्षणसंस्थांनीही विद्यार्थ्यांच्या संयमाची परीक्षा पाहू नये. विद्यार्थी वारंवार निवेदने देत असतील, बैठका घेत असतील आणि तक्रारी मांडत असतील, तर त्यांची दखल घेणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. निर्णय प्रक्रियेत पारदर्शकता, वेळेवर माहिती आणि तक्रार निवारणाची परिणामकारक व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे.

आज रस्त्यावर उतरलेला विद्यार्थी उद्याचा डॉक्टर, अभियंता, शिक्षक, संशोधक, उद्योजक किंवा प्रशासकीय अधिकारी असू शकतो. त्याच्या मनात व्यवस्थेविषयी निर्माण होणारा विश्वास किंवा अविश्वास भविष्यातील समाजरचनेवर परिणाम करतो. म्हणून विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे केवळ शैक्षणिक समस्या म्हणून न पाहता त्याकडे राष्ट्राच्या भवितव्याचा प्रश्न म्हणून पाहण्याची गरज आहे.

विद्यार्थ्यांना आंदोलन करण्याची वेळ येऊ नये, हीच खरी व्यवस्था; आणि आंदोलन झालेच तर त्यामागील प्रश्न समजून घेऊन तोडगा काढणे, हीच लोकशाहीची खरी कसोटी.

भारताच्या रस्त्यांवर न्यायासाठी उतरलेला विद्यार्थी हा केवळ आपल्या हक्कासाठी लढत नाही; तो अधिक पारदर्शक, जबाबदार आणि संवेदनशील व्यवस्थेची मागणी करत असतो. त्याचा आवाज दाबण्याऐवजी तो ऐकला गेला पाहिजे. कारण आज विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले, तर उद्या त्याच प्रश्नांचे रूपांतर संपूर्ण समाजाच्या प्रश्नांत होऊ शकते.

# थोडक्यात पण महत्वाचे



## नांदूर निंबादैत्य येथे एकल महिलांची बैठक उत्साहात!

पाथर्डी (स. गांवकरी) : पाथर्डी तालुक्यातील नांदूर निंबादैत्य येथील महादेव मंदिरात शनिवार, ३ ऑक्टोबर रोजी साऊ एकल महिला समिती, वात्सल्य शासकीय समिती आणि ग्राम विकास प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने एकल महिलांची बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी उपसरपंच भागवत वाघ होते. यावेळी परिसरातील सुमारे ४५ ते ५० एकल महिला उपस्थित होत्या. बैठकीत पाथर्डी येथील वात्सल्य समितीचे कार्यकर्ते दिगंबर गाडे यांनी एकल महिलांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची सविस्तर माहिती दिली. यामध्ये १८ वर्षांखालील बालकांसाठी बाल संगोपन योजना, संजय गांधी निराधार योजना, लाडकी बहीण योजना, आयुष्मान भारत कार्डचे फायदे तसेच बचत गटाच्या माध्यमातून महिलांना मिळणारे विविध फायदे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच एकल महिलांचे सर्वेक्षण करण्यासाठी असलेले नमुना फॉर्म व सर्वेक्षण माहितीचे नमुना फॉर्म महिलांकडून भरून घेण्यात आले. या बैठकीस तिन्ही अंगणवाडी सेविका व मदतनीस, बचत गट तयार करण्यासाठी मार्गदर्शन करणाऱ्या अर्चना दत्तात्रय दहिफळे, स्वाती दौंड, विकास वाघ, मच्छिंद्र काकडे, बंडू नाना खंबायत आदी उपस्थित होते. शासनाच्या विविध योजनांची माहिती थेट महिलांपर्यंत पोहोचवून त्यांना योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी अशा बैठका उपयुक्त ठरत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.



## महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती उत्साहात साजरी!

ठाणे (स. गांवकरी) : शेठ एन. के. टी. कार्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती अत्यंत आदरपूर्वक व उत्साहात साजरी करण्यात आली. संस्थाप्रमुख श्री. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या हस्ते महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आरती करण्यात आली. यावेळी नानजीभाईंनी विद्यार्थ्यांना दोन्ही राष्ट्रपुरुषांच्या जीवनकार्याची, विचारांची आणि देशासाठी दिलेल्या योगदानाची माहिती दिली. महात्मा गांधीजींचे सत्य, अहिंसा, साधेपणा व प्रामाणिकपणा, तसेच लालबहादूर शास्त्रीजींची देशसेवा, कर्तव्यनिष्ठा व साधेपणाचे आदर्श विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात आले. राष्ट्रपुरुषांच्या विचारांचा आपल्या दैनंदिन जीवनात अंगीकार करून सत्य, शिस्त, स्वच्छता, प्रामाणिकपणा आणि देशप्रेम या मूल्यांना महत्त्व देण्याचे आवाहन करण्यात आले. या प्रसंगी नानजीभाई ठक्कर यांच्या हस्ते प्रत्येक विद्यार्थ्याला 'गीता सार' हे पुस्तक आणि पेन भेट देण्यात आले. कार्यक्रमास क्रीडा शिक्षक सुहोत्रो रॉय, रमीझ तडवी यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रपुरुषांच्या विचारांनी प्रेरित वातावरणात कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. विद्यार्थ्यांना 'गीता सार' पुस्तकाच्या माध्यमातून जीवनमूल्यांची शिकवण देत शिक्षणासोबत संस्कारांची जोड देण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

## व्यापार उत्सवात नानजीभाई ठक्कर यांचा पगडी व सन्मानचिन्ह देऊन गौरव



मुंबई (स. गांवकरी) : नेहरू सेंटर येथे २ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या व्यापार उत्सवात शेठ श्री. नानजीभाई खीमजीभाई ठक्कर ठाणावाला यांचा पगडी परिधान करून व सन्मानचिन्ह प्रदान करत विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी 'जन्मभूमी'चे संपादक श्री. कुंदनभाई व्यास, 'कच्छमित्र'चे विश्वस्त श्री. हार्दिक मेमाणिया, श्री. राजेंद्र पुराणी, श्री. राजेंद्र पांडे, श्री. राजूभाई 'जन्मभूमी' यांच्यासह मोठ्या संख्येने व्यापारी बांधव उपस्थित होते. कार्यक्रमातील लकी ड्रॉमध्ये भाग्यवान विजेत्यास नानजीभाई ठक्कर यांच्या हस्ते १ ग्रॅम सोन्याची भेट प्रदान करण्यात आली. नानजीभाई ठक्कर यांच्या विशेष उपस्थितीबद्दल आयोजकांनी आभार व्यक्त करत त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा वाढल्याचे सांगितले. यावेळी श्री. कुंदनभाई व्यास यांच्या हस्ते नानजीभाई ठक्कर यांना पगडी परिधान करून सन्मानचिन्ह देत गौरविण्यात आले. सत्काराला उत्तर देताना नानजीभाई ठक्कर यांनी आयोजकांचे आभार मानत हा सन्मान आपल्यासाठी आनंददायी आणि कायम स्मरणात राहणारा असल्याचे सांगितले. व्यापारी समाज हा केवळ व्यापारापुरता मर्यादित नसून समाजाच्या विकासात त्याची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे त्यांनी नमूद केले. "आपण सर्वांनी एकत्र येऊन एकमेकांना सहकार्य केले पाहिजे. नव्या व्यापाऱ्यांना आणि युवकांना प्रोत्साहन देत समाजाच्या प्रगतीमध्ये योगदान दिले पाहिजे. व्यापारी बांधवांना एकत्र आणणारे असे उपक्रम स्नेह, एकता आणि सहकार्य वाढविण्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत," असे नानजीभाई ठक्कर यांनी सांगितले. तसेच व्यापार उत्सव यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेणाऱ्या सर्व आयोजक व कार्यकर्त्यांचे त्यांनी अभिनंदन केले.

# एकाच वेळी ६० समाजोपयोगी उपक्रमांची उद्घोषणा

पुणे : (स. गांवकरी)



श्री राजचंद्र मिशनच्या वतीने अहो गुरूदेव सोहळ्याचे औचित्य साधून एकाच वेळी तब्बल ६० समाजोपयोगी उपक्रमांचा घोषणा नुकतीच करण्यात आली. श्री राजचंद्र मिशन धरमपूरचे प्रणेते गुरुदेव श्री राकेशजी यांनी सामाजिक, आरोग्य, शिक्षण, मानसिक आरोग्य, पशुरुग्णालय व निवारा केंद्र, विशेष मुलांसाठी शैक्षणिक सुविधा, महिला सक्षणीकरणाचे उपक्रम...अशा क्षेत्रांत हे नवे ६० उपक्रम नजिकच्या काळात कार्यरत होतील, असे जाहीर केले. गुरुदेव श्री राकेशजी यांच्या हिरक महोत्सवी वाढदिवसाचेही निमित्त या उद्घाषणेला लाभले होते. मुंबई येथील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे अहो गुरूदेव या विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यासाठी उद्योग, विज्ञान, तंज्ञत्रान, आरोग्य, शिक्षण, मनोरंजन, कला, राजकारण आदी क्षेत्रांतील विविध मान्यवर आवर्जून उपस्थित होते. तसेच या सोहळ्यासाठी जगभरातील २४ देशांमधून आणि २१४ शहरांमधून मोठ्या संख्येने अनुयायी उपस्थित होते. उद्घोषित नव्या उपक्रमांमध्ये प्रामुख्याने आरोग्य, सेवाकार्य आणि अध्यात्म, या क्षेत्रांवर भर देण्यात आला आहे. कर्करोग रुग्णालय, वैद्यकीय महाविद्यालय, प्राणी रुग्णालये व निवारा केंद्रे, विशेष मुलांसाठी सुविधा केंद्रे आणि महिला सबलीकरणासाठीचे उपक्रम प्राधान्यक्रमावर असल्याचे गुरुदेवांनी जाहीर केले. आध्यात्मिक केंद्रांसह ध्यानकेंद्रे, सहा नवीन सत्संग केंद्रे यांसह श्री गुरुदेवांच्या प्रवचनांचे विविध भाषांमध्ये प्रकाशन करण्याचा उपक्रम समाविष्ट आहे, अशी माहिती देण्यात आली.

# मुंबई संकल्प 'मध्ये नेते, विचारवंत आणि तज्ज्ञ एकत्र

### मुंबईतील द ताज महाल पॅलेस, कुलाबा येथे शासन, नेतृत्व, सामाजिक जबाबदारी आणि भारताच्या विकासप्रवासावर झाले विचारमंथन

मुंबई : (स. गांवकरी)




पाञ्चजन्यच्या 'सुशासन संवाद – मुंबई संकल्प' या उपक्रमात प्रमुख लोकप्रतिनिधी, धोरणकर्ते, विचारवंत, सामाजिक नेते आणि विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ एकत्र आले. मुंबईतील द ताज महाल पॅलेस, कुलाबा येथे आयोजित या संवादामध्ये सुशासन, नेतृत्व, सामाजिक जबाबदारी आणि भारताच्या विकासप्रवाससंदर्भात विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. पाञ्चजन्यच्या संवादमालिकेतील या विशेष भागात 'सुशासन' या संकल्पनेवर तसेच अधिक सक्षम आणि जबाबदार भारत घडविण्यामध्ये संस्था, नेतृत्व आणि नागरिकांची भूमिका यावर विशेष भर देण्यात आला. सार्वजनिक जीवन, संस्कृती, शिक्षण, सामाजिक जबाबदारी आणि देशाच्या बदलत्या अपेक्षा यांसंदर्भातील विविध विषयांवरही यावेळी विचारमंथन झाले. या कार्यक्रमाला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्राचे राज्यपाल श्री. जिष्णु देव वर्मा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अखिल भारतीय कार्यकारिणीचे सदस्य श्री. व्ही. भागय्या, अमृता हॉस्पिटल, फरिदाबादचे आध्यात्मिक संचालक स्वामी निजात्मानंद पुरी, प्रसिद्ध चित्रपट निर्माते व दिग्दर्शक डॉ. चंद्रप्रकाश द्विवेदी, गोरखपूरचे खासदार व अभिनेते श्री. रवि किशन, अभिनेते श्री. नितीश भारद्वाज, महाराष्ट्र सरकारचे कॅबिनेट मंत्री श्री. नितेश राणे, सीमांत सेवा फाउंडेशनचे सचिव श्री. सिद्धार्थ पटनी, महिला उद्योजक श्रीमती छाया नंजप्पा आणि एनएसईचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. आशीष कुमार चौहान उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या उद्घाटनपर भाषणात पाञ्चजन्यचे संपादक श्री. हितेश शंकर म्हणाले, "या संवादासाठी मुंबई हे योग्य ठिकाण आहे. परकीय आक्रमणे एखाद्या राष्ट्रासमोर आव्हान निर्माण करू शकतात; मात्र त्या राष्ट्राची जिद्द आणि विकासाची इच्छाशक्ती कमकुवत करू शकत नाहीत, याचे मुंबईचा इतिहास हे जिवंत उदाहरण आहे. 'सुशासन संवाद'च्या माध्यमातून प्रगतिशील आणि अर्थपूर्ण चर्चेद्वारे आपल्या समोर असलेल्या सामाजिक प्रश्नांवर नवीन उत्तरे शोधण्याच्या दिशेने योगदान देण्याचा पाञ्चजन्य चा प्रयत्न आहे. भारत २०४७ च्या विकसित भारताच्या संकल्पनेकडे वाटचाल करत असताना अशा संवादांचे महत्त्व अधिक वाढते. समाजावर चित्रपट आणि ओटीटी माध्यमांचा बदलता प्रभाव असो किंवा शिक्षण आणि आरोग्य क्षेत्र केवळ व्यावसायिक दृष्टिकोनातून चालविले जावे का, यासारखे प्रश्न असोत; आपल्या समाजाला आकार देणाऱ्या या विषयांचा खुलेपणाने, जबाबदारीने आणि दीर्घकालीन राष्ट्रीय दृष्टिकोनातून विचार करणे आवश्यक आहे." महाराष्ट्राचे राज्यपाल श्री. जिष्णु देव वर्मा म्हणाले, "विकसित भारत म्हणजे केवळ आर्थिक विकास किंवा आर्थिक मूल्यामध्ये वाढ नव्हे. सरकारी धोरणांचा शेवटच्या घटकापर्यंत प्रभावीपणे पोहोच होणे आणि समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत त्याचा लाभ पोहोचणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. ज्या व्यक्तींसाठी सरकारी धोरणे तयार केली जातात, त्यांच्यापर्यंत ती पोहोचली तरच विकसित भारताचा खरा अर्थ साकार होईल. यासाठी सरकार आणि समाज यांच्यात सुसूत्र समन्वय आणि भागीदारी आवश्यक आहे, हेच सुशासनाचे सार आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सरकार आणि जनता यांच्यात विश्वासाचे नाते निर्माण करणे गरजेचे आहे. त्याशिवाय शासनव्यवस्था प्रभावी होऊ शकत नाही."

# अकोले तालुक्यात पाणीपुरवठा योजनांसाठी २४ लाखांचा निधी!

### वीज प्रश्न सोडविण्यासाठी गुरुवारी तातडीची बैठक; पालकमंत्री विखे पाटील यांचे निर्देश!

अकोले : (स. गांवकरी)




टंचाईच्या पार्श्वभूमीवर अकोले तालुक्यातील पाणीपुरवठा योजनांसाठी तसेच विहिरींच्या कामांसाठी तातडीने २४ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. तसेच तालुक्यातील वीज समस्यांबाबत गुरुवारी तातडीची विशेष बैठक घेऊन सर्व प्रश्न मार्गी लावण्याचे निर्देश महावितरणच्या अधिकाऱ्यांना देण्यात आले.

अकोले येथे आयोजित टंचाई आढावा बैठकीत पालकमंत्री विखे पाटील यांनी तालुक्यातील विविध गावांतून आलेले शेतकरी व ग्रामस्थ यांच्याशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या निवेदनावर सकारात्मक प्रतिसाद देत, निधीअभावी पाणीपुरवठा योजनांची कामे रखडणे योग्य नसल्याचे त्यांनी सांगितले. पुढील संकट टाळण्यासाठी उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करणे आवश्यक असून, मागणीनुसार टँकरची उपलब्धता करून देण्यात यावी, असे निर्देशही त्यांनी दिले. यंदा पाण्याचा उद्भव ज्या ठिकाणी आहे, त्या ठिकाणी फिल्टर व पाण्याच्या टाक्या मंजूर करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बैठकीत महावितरणच्या कारभाराबाबत ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणात तक्रारी मांडल्या. मुथाळणे-पांगरेवाडी येथे आठ दिवसांपासून वीजपुरवठा खंडित असल्याची, तर कुंभेफळ येथे तब्बल २५ दिवस ट्रान्सफॉर्मर उपलब्ध झाला नसल्याची तक्रार करण्यात आली. लहीत खुर्द येथील शेतकरी व ग्रामस्थांकडून ट्रान्सफॉर्मरसाठी पैसे घेतल्याची बाबही पालकमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आली. माजी आमदार वैभव पिचड यांनी तालुक्यात वीज वितरण कंपनीचे एकच एजन्सी काम करीत असल्याची तक्रार केली. देवठाण येथील सबस्टेशनचे काम अद्याप सुरू नसल्याची गंभीर दखल घेत पालकमंत्री विखे पाटील यांनी गुरुवारी वीज समस्यांवर तातडीची बैठक घेऊन सर्व प्रश्न निकाली काढण्याच्या सूचना दिल्या.

वनपट्टे वाटप करताना सीमांकन झाले नसल्याची तक्रारही बैठकीत करण्यात आली. यासंदर्भात ४५ वनपट्टेधारकांच्या सुनावण्या पूर्ण झाल्या असून, बुधवारी प्रांताधिकाऱ्यांनी कॅम्प घेऊन संबंधित तक्रारी निकाली काढाव्यात, असे निर्देश देण्यात आले.

# कचरा घंटागाडी, शाळेच्या दोन खोल्या व पाण्याचा फिल्टर प्लॅंट

शिवनेरी : (स. गांवकरी)



ग्रामदैवत आई तुळजाभवानी पलंग यात्रा उत्सव निमित्त कुमशेत येथे अवघ्या काही महिन्यातच गावाला घंटागाडी दिली आहे . आपल्या हातामध्ये अजून साडेचार वर्ष विकाससाठी आहे असे गौरव उद्गार नवनिर्वाचित पंचायत समिती सदस्या उल्का मोरे यांनी सत्कार स्वीकारताना सांगितले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुमशेत येथे विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी नवीन शाळेच्या दोन खोल्या वर्ग व शाळेला पाण्याचा फिल्टर प्लॅंट यानिमित्ताने दिला आहे असे गौरव उद्गार नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्या छाया तांबे यांनी सत्कार स्वीकारताना सांगितले. याप्रसंगी उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शिवसेना नेते बबन थोरात शिवसेना पक्ष सचिव विकास थोरात , जि. प. स. गुलाब पारखे , भाजप जिल्हाध्यक्ष गणेश कवडे, संचालक संतोष चव्हाण , पी एस आय सोनल डोके ,सरपंच रवींद्र डोके , ग्रामपंचायत सदस्य अंबादास डोके , उपशिक्षक श्याम लालोपोड यांनी यात्रेनिमित्त शुभेच्छा दिल्या. आई तुळजाभवानी पंलगाचे आगमन दु. ४ वा . ढोल ताशाच्या गजर , फटाक्यांची आदेशबाजी, आई राजा उदो उदो... तुळजापूर भवानी माते की जय.. अशा विविध ग्रामस्थांनी व भक्तांनी घोषणा देत जोरदार आगमन झाले. पिंपळाच्या झाडाजवळ भाविक भक्तांनी हार, फुले विणी , फुलांची चादर व पूजा विधी संपन्न केली. यावेळी जय अंबिका प्रसादिक भजनी मंडळ यांनी टाळ मृदुंग विना हातात घेऊन भाविक भक्तांनी अभंग सादर केले.

# सचिन बांगर मंगळवारी उमेदवारी अर्ज दाखल करणार

पुणे : (स. गांवकरी)





पुणे पदवीधर मतदारसंघातील विधानपरिषद निवडणुकीसाठी युवासेना कार्यकारिणी सदस्य श्री. सचिन मधुकर बांगर हे मंगळवार, दि. ६ ऑक्टोबर २०२६ रोजी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, युवा खासदार डॉ.श्रीकांतजी शिंदे, शिवसेना संपर्कप्रमुख, किल्ले शिवनेरी जुन्नरचे आमदार शरददादा सोनवणे आणि शिवसेना जिल्हाप्रमुख देविदास दरेकर, भगवान पोखरकर, बापूसाहेब शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना पक्षाकडून आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

विद्यार्थी चळवळीतून सामाजिक व राजकीय कार्याची सुरुवात केलेल्या सचिन बांगर यांनी भारतीय विद्यार्थी सेना तसेच युवासेनेच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून युवक व पदवीधरांच्या प्रश्नांसाठी सातत्याने काम केले आहे. शिक्षण, रोजगार, कौशल्यविकास, विद्यार्थ्यांच्या समस्या तसेच युवकांना संधी उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी विविध स्तरांवर पाठपुरावा केला आहे. पुणे जिल्ह्यासह पश्चिम महाराष्ट्रात युवासेनेची संघटनात्मक बांधणी करत मोठ्या संख्येने युवकांना संघटनेशी जोडण्याचे काम त्यांनी केले आहे. एम.ए. राज्यशास्त्र शिक्षण घेतलेले सचिन बांगर हे अभ्यासू, उच्चशिक्षित आणि ग्रामीण भागाशी नाळ जोडलेले युवा नेतृत्व म्हणून ओळखले जातात. सामाजिक उपक्रम, युवक सक्षमीकरण, रोजगारनिर्मिती आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर सातत्याने काम करत त्यांनी व्यापक जनसंपर्क निर्माण केला आहे. शिवसेना मुख्यनेते तथा महाराष्ट्राचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री मा.ना.एकनाथजी शिंदे साहेब, युवा खासदार डॉ.श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून पक्षसंघटन मजबूत करण्यासाठी त्यांनी सातत्याने योगदान दिले आहे.

उमेदवारीबाबत सचिन बांगर म्हणाले, "गेल्या अनेक वर्षांपासून शिवसेना आणि युवासेनेच्या माध्यमातून युवक व पदवीधरांच्या प्रश्नांशी सातत्याने जोडलेलो आहे. पदवीधरांच्या अपेक्षा, शिक्षण, रोजगार आणि भविष्यातील संधी यासाठी प्रभावीपणे काम करण्याचा माझा प्रयत्न राहील. शिवसेना मुख्यनेते तथा उपमुख्यमंत्री मा.ना.एकनाथजी शिंदे साहेब हे कार्यकर्त्याला न्याय देणारे नेतृत्व आहे. त्यामुळे माझ्या कार्याची निश्चितच दखल घेतली जाईल, असा मला विश्वास आहे." सचिन बांगर यांच्या उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या प्रसंगी सर्व शिवसेना पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, शिवसैनिक, पदवीधर बंधू-भगिनी, युवासैनिक, कार्यकर्ते व हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शिवसेना तालुकाप्रमुख श्री.प्रविण थोरात पाटील यांनी केले आहे.

# सासू-सुनेचे पवित्र नाते जपणारे चव्हाण कुटुंब समाजासाठी आदर्श : ह.भ.प. माऊली महाराज वाबळे

## कै. सईंद्राबाईंच्या संस्कारांनी फुलला चव्हाण परिवार; कुटुंबवत्सल मातेच्या स्मृतींना हजारोंची भावपूर्ण आदरांजली!

(स. गांवकरी)





डॉ. विश्वासराव आरोटे
कळसुबाई शिखरावरून

सासू आणि सून हे नाते केवळ कौटुंबिक नाते नसून ते प्रेम, आपुलकी, त्याग आणि संस्कारांनी जपले जाणारे पवित्र नाते आहे. ज्या घरामध्ये सासू-सुनेचे नाते प्रेमाने आणि विश्वासाने जपले जाते, त्या कुटुंबाला यशाची भरारी घेण्यापासून कोणीही रोखू शकत नाही. एकत्र कुटुंब पद्धती ही आपल्या संस्कृतीची आणि यशस्वी कुटुंबव्यवस्थेची ओळख असून, वडज येथील चव्हाण परिवाराने हे नाते आणि संस्कार जपत समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे, असे प्रतिपादन नामांकित कीर्तनकार तथा व्यसनमुक्तीचे प्रख्यात मार्गदर्शक ह.भ.प. माऊली महाराज वाबळे यांनी केले.

पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात, शिवनेरी किल्ल्याच्या पायथ्याशी वसलेल्या वडज गावातील चव्हाण परिवारातील मातोश्री कै. गं. भा. सईंद्राबाई मार्तंड चव्हाण यांच्या दशक्रिया विधीनिमित्त आयोजित श्रद्धांजलीपर कार्यक्रमात ह.भ.प. माऊली महाराज वाबळे प्रवचनरूपी सेवेत बोलत होते. कै. सईंद्राबाई चव्हाण यांनी आपल्या आयुष्यात कुटुंबाला एकत्र ठेवत संस्कार, त्याग आणि प्रेमाची शिकवण दिली. त्यांच्या निधनाने चव्हाण परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असला तरी, त्यांनी दिलेले संस्कार आणि विचार पुढील पिढ्यांसाठी कायम प्रेरणादायी राहतील, असे महाराजांनी सांगितले.

कै. सईंद्राबाई चव्हाण यांच्या कुटुंबाची समाजासाठी असलेली बांधिलकी अधोरेखित करताना माऊली महाराज म्हणाले की, चव्हाण परिवारातील मुलांनी केवळ शेती व्यवसायापुरते मर्यादित न राहता सामाजिक क्षेत्रातही उल्लेखनीय योगदान दिले आहे. या परिवाराची सामाजिक जडणघडण आणि वारकरी संप्रदायाशी असलेली नाळ अनेक वर्षांपासून घट्ट आहे. वडज गावानेही अनेक पिढ्यांपासून वारकरी संप्रदायाची पताका अभिमानाने जपली असून, अनेक कीर्तनकार, प्रवचनकार आणि संतविचारांची परंपरा या भूमीत रुजली आहे.

चव्हाण परिवारातील कन्येचा वाबळे परिवाराशी असलेला संबंध आणि त्यानंतर तिने चव्हाण परिवारात जपलेले नाते याचाही माऊली महाराजांनी आवर्जून उल्लेख केला. या परिवारातील प्रत्येकाचे दुःख आणि सुख हे आपलेच मानून अनेकांच्या संसाराला आधार देण्याचे काम त्यांनी केले. समाजातील तरुणांना उभे करण्यासाठी आणि गरजू कुटुंबांना मदतीचा हात देण्यासाठी या परिवाराने नेहमीच पुढाकार घेतला असल्याचे त्यांनी सांगितले.

कै. मार्तंड चव्हाण यांच्या सामाजिक योगदानाची आठवण सांगताना महाराजांनी त्यांच्या संघर्षमय जीवनप्रवासालाही उजाळा दिला. मुंबई येथे नोकरी करत असताना आपल्या भागातून रोजगारासाठी मुंबईत येणाऱ्या अनेक तरुणांना त्यांनी आधार दिला. स्वतःच्या खोल्या उपलब्ध करून देत अनेकांना मोफत निवासाची सोय केली. दिवसभर एसटी चालक म्हणून कर्तव्य बजावल्यानंतरही रात्री टॅक्सी चालवत कष्ट करण्याची त्यांची तयारी होती. कामावर श्रद्धा, कुटुंबाप्रती जबाबदारी आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी हा त्यांच्या जीवनाचा आदर्श होता.

याच संस्कारांचा वारसा त्यांच्या मुलांनी पुढे नेला असून, चव्हाण परिवारातील दोन्ही मुले आणि मुलगी नामांकित विधिज्ञ म्हणून कार्यरत आहेत. नवनाथ चव्हाण हे मुंबईतील घाटकोपर परिसरात भारतीय जनता पक्षाचे महामंत्री म्हणून जबाबदारी सांभाळत असून, आपल्या व्यवसायासोबतच सामाजिक कार्यासाठीही योगदान देत आहेत. स्वतःच्या उत्पन्नातील काही भाग समाजोपयोगी कामांसाठी खर्च करण्याची त्यांची भूमिका ही कै. सईंद्राबाई यांनी दिलेल्या संस्कारांचेच फलित असल्याचे माऊली महाराजांनी नमूद केले.

"या मातोश्रीने चांगल्या रत्नांना जन्म दिला आणि त्या रत्नांनी आपल्या कर्तृत्वाने समाजात हिऱ्याप्रमाणे चमक निर्माण केली," अशा शब्दांत माऊली महाराजांनी कै. सईंद्राबाई यांच्या मातृत्वाचा गौरव केला. आदर्श माता, आदर्श सासू आणि आदर्श गृहिणी म्हणून त्यांनी कुटुंबाला दिलेले योगदान अविस्मरणीय आहे. त्यांच्या दोन्ही सुनांनीही आईची मनापासून सेवा केली. यावेळी दोन्ही सुना व दोन्ही मुलांचा ह.भ.प. माऊली महाराज वाबळे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. माऊली महाराजांनी कै. सईंद्राबाई यांच्या स्मृतींना उजाळा देताना आईच्या महिम्यावर भावस्पर्शी कविता सादर केली. त्यांच्या ओघवत्या शब्दांनी उपस्थितांचे मन हेलावून गेले आणि अनेकांना अश्रू अनावर झाले. "आई-वडिलांचे दीर्घायुष्य लाभून वयाच्या ८५, ९० किंवा ९५ वर्षी त्यांचे निधन झाल्यानंतर कुटुंबीयांनी त्यांचा आनंदाने निरोप घेणे ही एक वेगळी भावना आहे; मात्र वयाच्या २०, ४० किंवा ५० वर्षांतच आई-वडिलांना आपल्या मुलांची दशक्रिया करावी लागणे यापेक्षा मोठे दुःख या जगात दुसरे कोणतेही नाही," असे सांगत त्यांनी तरुणांना व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन केले. आजच्या तरुणांनी व्यसनाधीनतेपासून दूर जाऊन संत साहित्याचे वाचन केले पाहिजे. संत ज्ञानेश्वर माऊलींनी शेकडो वर्षांपूर्वी लिहून ठेवलेल्या ज्ञानेश्वरीतील विचारांमधून आजही समाजाला ऊर्जा आणि जगण्याची दिशा मिळते. संत ज्ञानेश्वर माऊलींचे कार्य इतके महान आहे की, आजही संपूर्ण वारकरी संप्रदाय त्यांचा ऋणी आहे. वारकरी संप्रदायामध्ये समाजाला एकत्र ठेवण्याची आणि माणसाला माणसाशी जोडण्याची मोठी ताकद आहे, असेही माऊली महाराजांनी स्पष्ट केले. "चंद्र-सूर्य आहेत तोपर्यंत व्यसनमुक्तीचा संदेश जिवंत राहिला पाहिजे. प्रत्येक घरामध्ये प्रेम, संस्कार, एकत्र कुटुंब पद्धती आणि व्यसनमुक्तीचे वातावरण निर्माण झाले तर समाज अधिक निरोगी आणि सुदृढ बनेल," असा संदेश त्यांनी यावेळी दिला. दरम्यान, कै. सईंद्राबाई चव्हाण यांच्या दशक्रिया विधीनिमित्त चव्हाण परिवाराने केवळ श्रद्धांजली न वाहता समाजोपयोगी उपक्रम राबवून त्यांच्या स्मृतींना आगळ्या पद्धतीने अभिवादन केले. वडज येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक व वारकरी संप्रदायाशी संबंधित साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले.

कै. सईंद्राबाई यांनी आयुष्यभर कुटुंबाला प्रेमाने बांधून ठेवले. त्यांनी दिलेले संस्कार, त्याग आणि माणुसकीची शिकवण चव्हाण परिवार पुढील पिढ्यांपर्यंत घेऊन जाईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. सुमारे २५ ते ३० हजार मान्यवर, नातेवाईक, ग्रामस्थ आणि नागरिकांनी उपस्थित राहून कै. सईंद्राबाई चव्हाण यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. अखेरीस पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

यावेळी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. अनेक मान्यवरांनी कै. सईंद्राबाई चव्हाण यांच्या कार्याला आणि त्यांच्या प्रेमळ स्वभावाला उजाळा देत चव्हाण परिवाराच्या सामाजिक योगदानाचे कौतुक केले. "काळी देवा, काय गुन्हा केलास तू? आमच्या देव्हाऱ्यातील आमची माय-माऊली आम्हापासून हिरावून नेलीस," अशा भावनिक शब्दांत उपस्थितांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

# थोडक्यात पण महत्वाचे

## पत्रकार संतोष पडवळ यांच्या कन्येची डॉक्टर होण्याची स्वप्नपूर्ती



■ मेहनत, जिद्द आणि कुटुंबाच्या पाठबळातून BHMS पदवी

ठाणे (स. गांवकरी) : पत्रकार संतोष पडवळ यांच्या कन्येने आपल्या मेहनत, जिद्द आणि सातत्याच्या जोरावर वैद्यकीय क्षेत्रातील शिक्षण पूर्ण करून BHMS (Bachelor of Homoeopathic Medicine and Surgery) पदवी संपादन केली आहे. २०२६ मध्ये निकाल जाहीर झाल्यानंतर ती अधिकृतपणे डॉक्टर झाली असून, तिच्या या यशामुळे पडवळ कुटुंबात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. भक्ती संतोष पडवळ हिच्या शैक्षणिक प्रवासात दहावीच्या परीक्षेत तिने ८३ टक्के गुण मिळवले. त्यानंतर बारावीचे शिक्षण पूर्ण करून वैद्यकीय क्षेत्रात करिअर करण्याच्या ध्येयाने तिने NEET परीक्षा दिली आणि ती उत्तीर्ण झाली. ऑनलाइन सेल प्रक्रियेद्वारे तिची Dr. R. S. Gunjal Institute संगमनेर (नाशिक) येथे BHMS अभ्यासक्रमासाठी निवड झाली. सन २०२२ मध्ये प्रवेश घेतल्यानंतर २०२२ ते २०२६ या कालावधीत तिने अभ्यास, प्रॅक्टिकल्स, क्लिनिकल ट्रेनिंग आणि परीक्षांमध्ये सातत्याने मेहनत घेत आपले वैद्यकीय शिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले. या यशामागे आई-वडिलांची खंबीर साथ, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि कुटुंबीय व आप्तेष्टांचा विश्वास यांचा मोठा वाटा असल्याचे तिने सांगितले. "एक स्वप्न होतं डॉक्टर होण्याचं... मेहनत केली, संघर्ष केला आणि आज ते स्वप्न पूर्ण झालं. नावापुढे 'Dr.' ही दोन अक्षरे लागणे ही माझ्या आयुष्यातील सर्वात मोठी कमाई आहे," अशा भावना तिने व्यक्त केल्या. मुलीच्या या यशामुळे पत्रकार संतोष पडवळ आणि त्यांच्या कुटुंबीयांचा आनंद द्विगुणित झाला असून, तिच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## जनहित पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत संपन्न

आंबेगाव (स. गांवकरी) : आदर्श गाव गावडेवाडी (ता आंबेगाव ) येथील जनहित बिगर शेती ग्रामीण सहकारी पतसंस्था या संस्थेची २७वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी (ता . २१) रोजी पतसंस्थेचे अध्यक्ष जनार्दन बाळकृष्ण गावडे यांचे अध्यक्षतेखाली पांडुरंग मंदिरात संपन्न झाली . गावातील पांडुरंग मंदिरात संपन्न झालेल्या या सभेचे प्रास्ताविक पतसंस्थेचे उपाध्यक्ष सुरेश भोर यांनी केले विषय पत्रिकेचे वाचन मुख्य कार्यकारी अधिकारी संचितां निघोट व अंतर्गत लेखा परीक्षक लक्ष्मण पिंपळे यांनी केले यावेळी सभासदांना १२ % टक्के लाभांश देण्यात येणार असल्याचे अध्यक्ष जनार्दन बाळकृष्ण गावडे यांनी सांगितले . सभेच्या चर्चेमध्ये हिरकणी विद्यालयाचे संचालक अशोक डोंगरे गावडेवाडी चे माजी तंटामुक्ती अध्यक्ष बाळू चिमाजी गावडे ,शामकांत शिंदे सोसायटीचे माजी चेअरमन रवींद्र रघुनाथ गावडे आदींनी चर्चेत भाग घेतला या वेळी विषय पत्रिकेवरील सर्व विषयांना सभासदांनी बहुमताने मंजुरी दिली जनहित संस्थेचे सर्व सभासद संचालक लेखापरीक्षक अशोक गावडे आदी बहुसंख्येने उपस्थित होते या वार्षिक सभेसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी संचिता मनोज निघोट कोमल कराळे सोनल गावडे व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले सर्वांचे आभार तज्ञ संचालक आनंदराव रामचंद्र गावडे (काका गुरुजी) यांनी मानले.



## प्रकाश रामजी डाढाळे यांचे निधन

अर्धापूर (स. गांवकरी) : शहरातील श्रीरामनगर येथील रहिवाशी प्रकाश रामजी डाढाळे (वय ६५ वर्षे) यांचे अल्पशा आजाराने दि.४ रविवारी रोजी स.११ वा निधन झाले. त्यांच्या पार्थिव देहावर रविवारी रोजी सायंकाळी अर्धापूर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. प्रकाश रामजी डाढाळे यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा ,दोन मुली,नातवंड असा परिवार आहे. ते नवनाथ डाढाळे यांचे वडील, दिलीपराव डाढाळे व नितीन डाढाळे यांचे काका होत.



## कस्तुरबाई बेजगमवार यांचे निधन

नविन नांदेड (स. गांवकरी) : जिंदमनगर गोपाळचावडी येथिल रहिवाशी कस्तुरबाई दिनानाथ बेजगमवार यांचे दि ४ ऑक्टोंबर रोजी सकाळी ८.२० वाजता अल्पशा आजाराने त्यांच्या राहत्या घरी निधन झाले निधन समयी त्यांचे वय ८५ वर्षे होते. त्यांचा अंत्यसंस्कार दि ४ ऑक्टोंबर रोजी ४. ३० वा गोपाळचावडी येथिल स्मशान भुमित करण्यात आले असून त्यांच्या पश्चात प्रभाकर बेजगमवार बालाजी बेजगमवार चंदाताई बासटवार विठ्ठल बेजगमवार तिन मुले एक मुलगी यांच्या सह सुना नातु पंतु असा मोठा परिवार आहे .

# बुद्धिबळ स्पर्धेत विराज मचेची चमकदार कामगिरी

श्रीगोंदा : (स. गांवकरी)



महादजी शिंदे इंग्लिश मीडियम स्कूलचा विद्यार्थी विराज दीपक मचे याने जिल्हास्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत उल्लेखनीय यश संपादन केले. या दमदार कामगिरीच्या जोरावर विराजची विभागीय स्तरावरील बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली आहे. विराजने स्पर्धेत आपल्या बुद्धिचातुर्याचा, एकाग्रतेचा आणि उत्कृष्ट खेळकौशल्याचा परिचय देत प्रतिस्पर्ध्यांसमोर प्रभावी कामगिरी केली. त्याच्या या यशामुळे महादजी शिंदे इंग्लिश मीडियम स्कूलच्या शैक्षणिक तसेच क्रीडा क्षेत्रातील यशाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. विराजच्या या उल्लेखनीय यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेब भोस, महादजी शिंदे विद्यालयाचे प्राचार्य दिलीप भुजबळ, मुख्याध्यापिका शेख एस. ए. मॅडम, पत्रकार पीटर रणसिंग तसेच शिक्षकवृंद, पालक आणि विद्यार्थ्यांनी त्याचे अभिनंदन केले. विभागीय स्तरावरील स्पर्धेतही विराजने उत्कृष्ट कामगिरी करून शाळेचे नाव उज्ज्वल करावे, यासाठी त्याला पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.

# जुन्नर तालुका दुष्काळग्रस्त यादीत समाविष्ट करावा

शिवनेरी : (स. गांवकरी)



महाराष्ट्र सरकारने ३५८ पैकी ३०८ तालुके दुष्काळग्रस्त घोषित केले पण जुन्नर तालुका दुष्काळग्रस्त घोषित केला नाही . जुन्नर तालुक्यात पावसाचे प्रमाण कमी आहे. तालुक्यातील पूर्व भाग आदिवासी सर्व परिसरातील खरीप हंगामातील पिके जळाली आहेत . महाराष्ट्र सरकारने ताबडतोब जुन्नर तालुका दुष्काळग्रस्त यादी समाविष्ट करावा. तालुक्याचे शेतकरी बांधवांना शासनाचे अनुदान व दुष्काळी सवलतीचा लाभ मिळावा . यासाठी असे उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने सह संपर्कप्रमुख दिलीप बाम्हणे यांनी निवेदन तहसील अधिकारी कुलकर्णी यांना निवेदन दिले आहे . तालुक्यातील पठार भागावर पाणी , चारा उपलब्ध नाही. खरीप हंगामातील सोयाबीन व इतर पिके पूर्णपणे जळाली आहेत . बेल्हा महसूल विभागातील सर्व गावांमध्ये पाण्याची समस्या बिकट झाली. असे विधानसभा प्रमुख आनंद रासकर यांनी सांगितले.

महाराष्ट्र सरकारने इतर तालुक्यात दुष्काळ जाहीर केला पण जुन्नर तालुक्यावर अन्याय का ? महसूल विभागातील प्रशासनाने खुर्च्या सोडा व तालुक्यात दुष्काळग्रस्त भागात फिरा असे माजी उपसभापती दिलीप डुंबरे यांनी याप्रसंगी सांगितले तालुक्यातील आदिवासी भागातील खडकावरील व मुरमा वरील भात , नाचणी खरीप हंगामातील सर्व पिके जळायला लागली आहेत. जनावरांचा चाऱ्याचा प्रश्न उभा राहिला आहे . आदिवासी शेतकरी पावसाच्या पिकावर अवलंबून असतो पण पाऊस पडला नाही त्यामुळे शेतकरी संकटात आहे असे माजी पंचायत समिती सदस्य कावा गागरे यांनी सांगितले . या प्रसंगी जिल्हा परिषद सदस्य गुलाब पारखे , आदिवासी नेते बन्सी चतुर, खंडू शिंदे , हभप धोंडीभाऊ पानसरे , विधानसभा संघटक संदीप ताजने रोहिदास गोरडे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी माजी नगरसेवक समीर भगत , अजय जाधव , शैलेश बनकर, जालिंदर रासकर , रामदास ताजणे ,सलीम मुलाणी, संजय ताजवे , प्रसाद बनकर, अभिषेक गवळी , सिद्धेश कर्डीले, वैभव चौगुले, सोहम फापाळे अनेक शेतकरी व शिवसैनिक पदाधिकारी उपस्थित होते .

# भैरवनाथ पतसंस्थेची दोन दिवसीय कार्यशाळा उत्साहात संपन्न

(स. गांवकरी)



भैरवनाथ पतसंस्थेच्या व्हिजन २०३२ अंतर्गत संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संस्थेच्या सर्व कर्मचारी वर्ग व संचालक मंडळाची दोन दिवसीय विशेष कार्यशाळा शिवसंकुल, लांडेवाडी येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

ही कार्यशाळा स्कूल ऑफ इन्स्पायरेशनल लीडरशिप यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेदरम्यान संस्थेच्या भविष्यातील वाटचालीसंदर्भात सखोल विचारमंथन करण्यात आले. व्हिजन २०३२ अंतर्गत संस्थेचा विस्तार, सभासदकेंद्री सेवा, ठेवी व कर्ज व्यवसायाची वाढ, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, कर्मचारी कौशल्यविकास, नेतृत्वगुणांचा विकास आणि संस्थेला अधिक सक्षम व आधुनिक वित्तीय संस्था बनविण्याच्या विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

संस्थेच्या पुढील दशकातील उद्दिष्टांची स्पष्ट दिशा निश्चित करताना "संस्थेची प्रगती ही प्रत्येक कर्मचारी, अधिकारी, संचालक आणि सभासदाच्या सहभागातूनच शक्य आहे", हा विचार कार्यशाळेत अधोरेखित करण्यात आला.

कार्यशाळेत कर्मचारी व संचालक मंडळामध्ये टीमवर्क, नेतृत्व, सकारात्मक दृष्टिकोन, जबाबदारीची जाणीव, ग्राहकसेवा आणि परिणामाभिमुख कार्यपद्धती याबाबत विविध उपक्रम व मार्गदर्शन सत्रे घेण्यात आली.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील यांनी संस्थेच्या भविष्यातील वाटचालीबाबत मार्गदर्शन करताना, बदलत्या आर्थिक व तंत्रज्ञानाच्या युगात संस्थेने नव्या संधींचा स्वीकार करून अधिक सक्षम, पारदर्शक आणि विश्वासार्ह वित्तीय संस्था म्हणून पुढे जाण्याची गरज व्यक्त केली. नजीकच्या भविष्यकाळात संस्थेची उलाढाल तीन,साडेतीन हजार कोटींच्या पुढे नेण्याचा मानस केला. संस्थेचे उपाध्यक्ष सागर काजळे यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या कामकाजाचा आढावा घेऊन भविष्यकालीन संस्थेच्या वाटचालीची भूमिका विषद केली तसेच कर्मचारी वर्गाने आपली क्षमता विकसित करण्याचे आवाहन केले.

व्हिजन २०३२ हे केवळ एक उद्दिष्ट नसून संस्थेच्या उज्ज्वल भविष्यासाठीचा सामूहिक संकल्प आहे, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

दोन दिवसीय कार्यशाळेमुळे कर्मचारी वर्ग व संचालक मंडळामध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, संस्थेच्या आगामी वाटचालीसाठी नवीन ऊर्जा, स्पष्ट दिशा आणि एकजुटीची भावना निर्माण झाली आहे.

याप्रसंगी डायनालॉग इंडियाचे कार्यकारी संचालक अक्षयआढळराव पाटील, एस आय एल संस्थेचे संचालक डॉ. योगेश पवार, सतिश नायर, मानसी प्रभुदेसाई, काजल मालापुडी, उत्कर्ष जुनेजा व सहकारी, भैरवनाथ पतसंस्थेचे संचालक सौ. कल्पना आढळराव पाटील, महेश ढमढेरे, हनुमंत तागड, अभिमन्यू लांडगे, सौ. शोभा आवटे, सौ. अंजली थोरात उपमुख्य कार्यकारी अधिकारी रमेश खरमाळे, सर्व शाखाधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

# वाहनाच्या धडकेत हरणाचा मृत्यू



तामसा : (स. गांवकरी)

पावसाअभावी निर्माण झालेली पाणीटंचाई आणि पाण्याच्या शोधात वन्यप्राण्यांचा मानवी वस्तीकडे वाढणारा वावर यामुळे वन्यजीवांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. तामसा परिसरातील डोरली येथे राज्य महामार्ग क्रमांक २५१ वर अज्ञात वाहनाच्या धडकेत एका हरणाचा मृत्यू झाल्याची घटना ३ ऑक्टोबर रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, डोरली परिसरातून जाणाऱ्या राज्य महामार्गावर पाण्याच्या शोधात आलेल्या हरणाला अज्ञात वाहनाने धडक दिली. या अपघातात हरणाचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच वनरक्षक बालाजी बनसोडे यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. त्यानंतर मृत हरणाच्या मादीवर अंत्यसंस्कार करण्यात आले.

यावेळी वनमजूर बाबुराव चव्हाण, वाहनचालक सुधीर भागवत, गावकरी तसेच पोलीस पाटील यांनी घटनेची माहिती वनविभागाला दिली. वन्यप्राणी पाण्याच्या शोधात रस्ते ओलांडत असताना वाहनांच्या धडकेत त्यांचा जीव जाण्याच्या घटना चिंतेचा विषय बनत आहेत.

# नांदूर निंबादैत्य येथे एकल महिलांची बैठक

पाथर्डी : (स. गांवकरी)



तालुक्यातील नांदूर निंबादैत्य येथील महादेव मंदिर येथे शनिवार ३ ऑक्टोबर रोजी दहा वाजता साऊ एकल महिला समिती, वात्सल्य शासकीय समिती व ग्राम विकास प्रतिष्ठान यांचे संयुक्त विद्यमाने एकल महिलांची बैठक घेण्यात आली.बैठकीच्या अध्यक्षस्थानी उपसरपंच श्री भागवत वाघ हे होते. या वेळी पाथर्डी येथील वात्सल्य समितीचे कार्यकर्ते दिगंबर गाडे यांनी एकल महिलांना शासनाच्या विविध योजना ची माहीती दिली. तसेच एकल महिलांचे सर्वेक्षण नमुना फॉर्म व एकल महिला सर्वेक्षण माहिती नमुना हे दोन्ही फॉर्म भरून घेतले. तसेच एकल महिलांसाठी असणाऱ्या विविध योजना या मध्ये -१८ वर्षा खालील बालकांना बाल संगोपन योजना,संजय गांधी निराधार योजना,लाडकी बहीण योजना, आयुष्यमान भारत कार्ड चे फायदे,बचत गटा मुळे होणारे फायदे. अशा विविध शासकीय योजनेची माहिती दिली. या बैठकीसाठी तिनही अंगणवाडी सेविका व मदतनीस तसेच बचत गट तयार करणाऱ्या अर्चना दत्तात्रय दहिफळे, स्वाती दौंड, विकास वाघ, मच्छिंद्र काकडे, बंडू नाना खंबायत आदींसह ४५ ते ५० एकल महिला उपस्थित होत्या.

# स्वच्छतेसाठी फोटो शेसन अधिकारी-कर्मचारी एकवटले

तामसा : (स. गांवकरी)



राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त तामसा ग्रामपंचायतीच्या वतीने राबविण्यात आलेल्या ग्रामस्वच्छता अभियानात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी एकत्र येत श्रमदान केले. शहरातील आठवडी बाजार, अंगणवाडी परिसर तसेच राष्ट्रीय महामार्गालगतच्या दुभाजकातील कचरा हटविण्यासाठी सुमारे चार तास स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. ग्रामपंचायत कार्यालयात गटविकास अधिकारी दशरथ आडेराव यांच्या हस्ते महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभियानाची सुरुवात करण्यात आली. यावेळी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वच्छतेची सामूहिक शपथ घेतली. तामसा शहरातील आठवडी बाजार परिसरात तसेच रस्त्याच्या दुभाजकात मोठ्या प्रमाणात साचलेला कचरा गोळा करण्यात आला. जमा केलेला कचरा ग्रामपंचायतीच्या घंटागाडीतून शहराबाहेर नेण्यात आला. शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी नागरिकांनीही प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. या अभियानात विस्तार अधिकारी मुंडकर, बाळासाहेब पवार, ग्रामपंचायतीचे प्रशासक गिरीधर मोळके, ग्रामविकास अधिकारी शंकर आलेवाड, कर्मचारी संभाजी हेंबाडे, अमित मोपलवार, किसन कोठूले, तेजस लाहेवार,यांच्यासह आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि सफाई कामगार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

स्वच्छता ही केवळ एका दिवसापुरती मर्यादित न राहता ती नियमितपणे राबविणे गरजेचे आहे. शहरातील कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता आणि नागरिकांमध्ये जनजागृती यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न होणे आवश्यक असल्याची भावना यावेळी प्रशासक अधिकारी गिरीधर मोळके यांनी व्यक्त करीत कर्मचाऱ्यांना धारेवर धरलं. महात्मा गांधी जयंतीनिमित्त अधिकारी-कर्मचाऱ्यांनी चार तास श्रमदान करून स्वच्छतेचा संदेश दिला. मात्र, शहरात नियमित स्वच्छता राखणे, कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे आणि सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता होऊ न देणे, ही प्रशासनाची रोजची जबाबदारी आहे. त्यामुळे स्वच्छता अभियान केवळ एका दिवसाचा उपक्रम न ठरता वर्षभर सातत्याने राबविण्याची गरज आहे. एक दिवसाची स्वच्छता नव्हे, तर कायमस्वरूपी स्वच्छ तामसा हेच अभियानाचे उद्दिष्ट असावे..

# ग्रामीण मातीतून अभिनय क्षेत्रात भरारी



## डॉ. बाळासाहेब खेंडके यांची 'सावित्रीबाई ज्योतिराव फुले' मालिकेत इंग्रज अधिकाऱ्याची भूमिका

श्रीगोंदा : (स. गांवकरी)

'पुत्र हो ऐसा गुंडा, त्याचा लागो तिन्ही लोकी झेंडा,' असे संत तुकाराम महाराजांनी म्हटले आहे. आपल्या कर्तृत्वाने गावाचे, तालुक्याचे आणि आपल्या मातीचे नाव उज्ज्वल करणाऱ्या व्यक्तींच्या बाबतीत ही उक्ती सार्थ ठरते. श्रीगोंदा तालुक्यातील मांडवगण येथील खेडकेवाडीच्या मातीतून आलेले आणि सध्या अभिनय क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणारे डॉ. बाळासाहेब खेंडके यांनी 'सावित्रीबाई ज्योतिराव फुले' या मालिकेत इंग्रज अधिकाऱ्याची भूमिका साकारत श्रीगोंदा तालुक्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.

ग्रामीण भागात शालेय शिक्षण घेत असतानाच कलेची आवड जोपासणाऱ्या डॉ. खेंडके यांनी अभिनयासोबतच लावणी, नृत्य आणि मॉडेलिंग या विविध कलाक्षेत्रांतही आपली ओळख निर्माण केली. त्याचबरोबर त्यांनी वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून वैद्यकीय सेवेतही योगदान दिले आहे. शिक्षण, वैद्यकीय सेवा आणि कला अशा विविध क्षेत्रांचा समतोल साधत त्यांचा प्रेरणादायी प्रवास सुरू आहे.

अभिनय क्षेत्रात काम करताना त्यांनी यापूर्वीही विविध मालिका आणि चित्रपटांमध्ये इंग्रज अधिकाऱ्यांच्या भूमिका साकारल्या आहेत. त्यांच्या अभिनयातील सहजता, व्यक्तिमत्त्व आणि भूमिकेला साजेशी देहबोली यामुळे त्यांना या प्रकारच्या ऐतिहासिक भूमिकांसाठी संधी मिळत गेली. आता 'सावित्रीबाई ज्योतिराव फुले' या मालिकेत अभिनेते डॉ. अमोल कोल्हे यांच्यासोबत काम करण्याची संधी डॉ. बाळासाहेब खेंडके यांना मिळाली आहे.



ठाणे : महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेल्या पान मसाला, सुगंधित तंबाखू व तत्सम अन्नपदार्थांची अवैध वाहतूक, साठवणूक आणि विक्री करणाऱ्यांविरोधात अन्न व औषध प्रशासनाने ठाणे आणि पालघर जिल्ह्यात धडक कारवाई केली. २ ऑक्टोबर रोजी ठाणे झोन-१०, ठाणे झोन-७ आणि पालघर झोन-१ येथे करण्यात आलेल्या कारवाईत प्रतिबंधित अन्नपदार्थ व वाहनांसह तब्बल २ कोटी ६९ लाख २९ हजार ८६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ठाणे झोन-१० अंतर्गत येवई ब्रिज परिसरात प्रतिबंधित पदार्थांची वाहतूक करणाऱ्या Eicher ट्रकवर छापा टाकण्यात आला. यामध्ये Premium Raj Niwas Pan Masalaची २७,५४० पाकिटे आणि ZN-01 Zafrani Zardaची २७,५४० पाकिटे असा ८१ लाख ५१ हजार ८४० रुपयांचा माल आढळून आला. तसेच सुमारे २० लाख रुपये किमतीचा ट्रक जप्त करण्यात आला.

## थोडक्यात बातम्या...



### कळवण तालुक्यात पावसाअभावी पिकांनी माना टाकल्या

■ सोयाबीन, मका, भुईमूग, उडीद, नागली, वरई सुकून गेलं - सरकार कधी जागं होणार?

कनाशी (स. गांवकरी) : कळवण तालुक्यात गेल्या दीड महिन्यापासून पावसाने पूर्णपणे पाठ फिरवली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. जून-जुलैमध्ये चांगल्या पावसाने पेरण्या झाल्या. पिकं भरगच्च आली, आशा वाढली. पण त्यानंतर आलेल्या कोरड्या खिंडीने सगळ्या आशेवर पाणी फिरवलं. सोयाबीन, मका, भुईमूग, उडीद, नागली, वरई अशी अंतिम टप्प्यात आलेली पिके आता पाण्याअभावी माना टाकून सुकून गेली आहेत. शेतात गेलं की दिसतंय - शेंगा भरल्या, पण दाणा पोसण्याआधीच झाडं कोमेजली. आता कितीही पाऊस झाला तरी उपयोग नाही शेतकऱ्यांनी कर्ज काढलं, सावकाराचे हातपाय जोडले, पेरणी केली. पीक हात येण्याची वेळ आली आणि निसर्गानेच दगा दिला. कोमेजलेली पिके पाहून शेतकरी बांधावर डोक्याला हात लावून बसला आहे. आणि ही फक्त सुरुवात आहे. पावसाने दीड महिना दडी मारल्याने यंदा तालुक्यात मोठ्या प्रमाणावर पाणी टंचाईची दाट शक्यता आहे. काही गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचे हाल आत्ताच सुरु झाले आहेत. मायबाप सरकार, फक्त कागदावर दुष्काळ जाहीर करून वेळ मारून नेऊ नका. प्रत्यक्षात तातडीने पंचनामे करा, पीक विमा लवकर मंजूर करा आणि नुकसान भरपाई थेट शेतकऱ्याच्या खात्यात जमा करा.

### निरंकारी इन्स्टिट्यूट ऑफ म्युझिक अँड आर्टचा संगीतमय सोहळा संपन्न




भोसरी (पुणे) (स. गांवकरी) : निरंकारी 'सदगुरू माता सुदीक्षा जी महाराज' यांच्या असीम कृपाशीर्वादाने संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन अंतर्गत संचालित निरंकारी इन्स्टिट्यूट ऑफ म्युझिक अँड आर्ट यांच्या वतीने 'स्वरभक्ती – एक सुरेल भक्ती संध्या' या विशेष संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन शनिवार, ३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ ते ८ या वेळेत संत निरंकारी सत्संग भवन, दिघी रोड, भोसरी येथे उत्साहात करण्यात आले. सन २०१५ मध्ये बाबा हरदेव सिंह जी महाराज यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या निरंकारी इन्स्टिट्यूट ऑफ म्युझिक अँड आर्टच्या देशभरात २५ शाखा कार्यरत आहेत. पिंपरी-चिंचवड मधील रूपीनगर शाखेत गेल्या एक वर्षापासून संस्थेच्या संगीत प्रशिक्षणाच्या उपक्रमांना सुरुवात झाली असून, अनेक विद्यार्थी नियमितपणे संगीताचे प्रशिक्षण घेत आहेत. संगीताच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासोबतच त्यांच्यामध्ये शिस्त, एकाग्रता आणि भारतीय संगीत परंपरेविषयी आवड निर्माण होत आहे. 'स्वरभक्ती' या भक्ती संध्येत विद्यार्थ्यांसह विविध कलाकारांनी गायन आणि वाद्यवृंदाच्या माध्यमातून सुरेल सादरीकरण केले. मधुर स्वर आणि वाद्यांच्या सुरांनी संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले. संगीताच्या माध्यमातून भक्ती, प्रेम, शांती आणि मानवी मूल्यांचा संदेश उपस्थितांपर्यंत पोहोचवण्यात आला.

### आणे, नळवणे, पेमदरा, शिंदेवाडी व इतर दुष्काळी गाव यादीमध्ये समावेश होणे गरजेचे

शिवनेरी (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील पूर्व भाग पठार भागाने वसलेला आहे . यामध्ये आणे नळवणे पेमदरा शिंदेवाडी व इतर पठार भागातील सर्व गावामध्ये चालू वर्षी कमी प्रमाणात पाऊस झाला आहे यामुळे या भागातील सर्व गाव दुष्काळी गावांच्या यादीमध्ये समावेश होणे गरजेचे आहे असे निवेदन येथील ग्रामपंचायत यांनी तहसीलदार यांना निवेदन दि. १ ऑक्टोंबर रोजी तहसीलदार यांना दिले आहे अशी माहिती उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे युवा सेना विधानसभा प्रमुख अभिषेक सुनील गवळी यांनी सांगितली आहे . तहसीलदार यांना दिलेली निवेदनात म्हटले आहे की , या परिसरातील सर्व खरीप पिके पावसावर अवलंबून आहेत. येथील सर्व शेतकरी बांधवांचा मुख्य दूध उत्पादक व्यवसाय आहे , पण पाऊस नसल्यामुळे सर्व संकटात आहेत . येथील शेतातील ज्वारी , तुराडाळ , मका , बाजरी , नाचणी, काळेवाल, उडीद, सोयाबीन , वाटाणा, हुलगा व इतर कडधान्य पाऊस न पडल्यामुळे करपून गेली आहेत. कुकडी प्रकल्पाच्या कॅनॉल मार्फत सिंचन व्यवस्था असलेल्या पारनेर चा दक्षिण भाग कर्जतचा करमाळा या तालुक्याचा दुष्काळ गावाच्या यादीत समावेश झालेला आहे. पण शेजारील लगत जुन्नर तालुका येथील गावांना कोणतीही पाण्याची सिंचन व्यवस्था नसतानाही दुष्काळ यादीत समावेश झालेला नाही . महाराष्ट्र सरकारने या भागातील शेतकऱ्यांवर अन्याय का केला ? आम्ही महाराष्ट्राचे भूमिपुत्र नाही का ? आम्हाला सावित्राची वागणूक वेगळी का ? शेजारील पारनेर तालुक्यातील गावांना दुष्काळी भाग म्हणून जाहीर व जुन्नर तालुक्यातील गावांना दुष्काळ भाग जाहीर न केल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे .या भागात दुष्काळाची भयानक परिस्थिती आहे.

## अकोले-भंडारदरा सायकल रॅलीतून वन्यजीव संवर्धनाचा जागर

### वन्यजीव सप्ताहानिमित्त ५५ किलोमीटरची सायकल रॅली उत्साहात संपन्न

अकोले : (स. गांवकरी)




वन्यजीव सप्ताहानिमित्त मॉर्निंग वॉक ग्रुप अकोले, अगस्ती सायकल क्लब अकोले आणि कळसुबाई हरिश्चंद्रगड अभयारण्य यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अकोले–भंडारदरा (पांजरे बेट) सायकल रॅली उत्साहात संपन्न झाली. या रॅलीत एकूण ४५ सायकलपटू सहभागी झाले होते.

त्यामध्ये महिलांचाही उत्स्फूर्त सहभाग होता. सहभागी सायकलस्वारांनी तब्बल ५५ किलोमीटरचे अंतर पार करत वन्यजीव, जैवविविधता आणि निसर्ग संवर्धनाचा संदेश जनमानसापर्यंत पोहोचविला. दरवर्षी २ ते ८ ऑक्टोबरदरम्यान वन्यजीव सप्ताह साजरा केला जातो. वन्यजीवांचे संरक्षण ही केवळ वन विभागाची जबाबदारी नसून समाजातील प्रत्येक घटकाने त्यामध्ये सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे, या उद्देशाने या सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

अकोले शहरापासून भंडारदरा परिसरापर्यंत सायकल चालवत सहभागी झालेल्या सायकलस्वारांनी पर्यावरण रक्षण आणि वन्यजीव संवर्धनाचा संदेश दिला. यावेळी झालेल्या कार्यक्रमात व्यासपीठावर नासिक वन्यजीव विभागाचे उपवनसंरक्षक IFS मा. कृष्णा भवर, सहाय्यक वनसंरक्षक मा. अनिल पवार, वनपरिक्षेत्र अधिकारी रुपेश गावित; प्रतिभा सोनवणे, डॉ. विष्णू बुळे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात कृष्णा भवर यांनी कळसुबाई हरिश्चंद्रगड अभयारण्यातील जैवविविधतेविषयी सखोल माहिती दिली. सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये आढळणाऱ्या विविध वनस्पती, वन्यप्राणी, पक्षी आणि त्यांच्या अधिवासाचे महत्त्व स्पष्ट करताना उपलब्ध असलेली ही नैसर्गिक संपदा भावी पिढ्यांसाठी जपणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. पर्यटकांनी निसर्गाचा आनंद घेताना वन्यजीवांच्या अधिवासाला कोणतीही बाधा पोहोचणार नाही, याची काळजी घेण्याचे आवाहनही त्यांनी केले.

सहाय्यक वनसंरक्षक अनिल पवार यांनी वन्यजीव व जैवविविधता संवर्धनासाठी नागरिकांनी कोणती भूमिका बजावली पाहिजे, याबाबत मार्गदर्शन केले.

जंगलातील प्रत्येक घटक हा पर्यावरणीय साखळीचा महत्त्वाचा भाग असून, एखाद्या घटकाचे नुकसान संपूर्ण परिसंस्थेवर परिणाम करू शकते. त्यामुळे वनक्षेत्रात कचरा न टाकणे, प्लास्टिकचा वापर टाळणे, वन्यजीवांना त्रास न देणे, जंगलातील वनस्पतींचे नुकसान न करणे आणि स्थानिक जैवविविधतेचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## पत्रकार विष्णू बुरे यांना जिवे मारण्याची धमकी

नवी मुंबई : (स. गांवकरी)



नवी मुंबई शहरातील.. पावणे एमआयडीसी शिवमंदिर परिसरात घडलेल्या एका धक्कादायक घटनेकडे आज आपण लक्ष वेधणार आहोत. दिनांक 02 सप्टेंबर 2026 रोजी रात्री सुमारे साडेनऊ वाजण्याच्या दरम्यान एका लेबर कॉन्ट्रॅक्टरकडून एका नागरिकाला मारहाण होत असल्याची घटना घडत होती. या घटनेबाबत नेमके काय घडले, संबंधित व्यक्तीला का मारहाण केली जात आहे, याची माहिती घेण्यासाठी समाजसेवक, सामाजिक कार्यकर्ता आणि डॅशिंग पत्रकार पत्रकार विष्णू बुरे यांनी घटनास्थळी विचारणा केली. मात्र, अन्यायग्रस्त व्यक्तीची बाजू जाणून घेण्याचा प्रयत्न केल्यामुळे लेबर कॉन्ट्रॅक्टर आणि त्याच्या भावाकडून उलट दमदाटी करण्यात आल्याचा आरोप आहे. "तू विचारपूस का केली?", "तुझा संबंध काय?" असे प्रश्न विचारत पत्रकार विष्णू बुरे यांना सार्वजनिक ठिकाणी धमकावण्याचा प्रयत्न करण्यात आला. या घटनेचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने निषेध करण्यात आला आहे तर संबंधित कॉन्ट्रॅक्टरच्या भावाने "आम्ही खूप वर्षांपासून येथे राहतो, तुला बघून घेऊ" अशा शब्दांत धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे.

## आदीवासी कुटुंबांना ५०हजार रुपये अनुदान स्वरूपात मदत द्यावी

राहाता (स. गांवकरी)

**शिवाजीराव गांगुर्डे**

शासनाने उद्योगपतींचे हजारो कोटी रुपयांचे कर्ज माफ केले आहे तसेच दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना मदत जाहीर केली आहे भीषण दुष्काळाने खरीप वाया गेल्याने शेतीवर व शेतमजुरीसह इतर रोजंदारीवर उदरनिर्वाह करणारा आदिवासी समाज बांधव सुद्धा संकटात आलो असून आदिवासींच्या रोजी रोटीचा प्रश्न निर्माण झाला आहे शासनाने दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर आदिवासी कुटुंबांना 50 हजार रुपये अनुदान स्वरूपात मदत द्यावी अन्यथा आदिवासी बांधव रस्त्यावर उतरतील असा इशारा आदिवासी समाजाचे नेते तथा राज्याध्यक्ष शिवाजीराव गांगुर्डे यांनी दिला आहे राहाता शहरातील घोलप मंगल कार्यालय येथे शनिवार दि. 3 रोजी शिवाजीराव गांगुर्डे यांच्या प्रमुख उपस्थितीत व अध्यक्षतेखाली आदिवासी समाज बांधवांचा मार्गदर्शन मेळावा संपन्न झाला याप्रसंगी बोलताना गांगुर्डे म्हणाले की दुष्काळाची परिस्थिती अत्यंत भयानक आहे खरीप वाया गेला शेती नापीक झाली ज्या शेतीवर आदिवासींची रोजी रोटी चालते तो शेती व्यवसाय संकटात सापडल्याने आदिवासींच्या रोजी रोटीचा प्रश्न निर्माण झाला आहे सरकारने हातावर पोट भरणाऱ्या आदिवासी समाजाचा सुद्धा विचार करून त्यांना आर्थिक मदत देणे गरजेचे असल्याचे यावेळी ते म्हणाले समाज बांधवांनी संघटितपणे शक्ती उभी करून समाजात असलेले दारिद्र्य अंधश्रद्धा आर्थिक विषमता सामाजिक मागासले पण यावर प्रहार करणे गरजेचे आहे महिलांचे संघटन उभे करून समाज सक्षमीकरणावर भर दिला जाणार असल्याचे यावेळी ते म्हणाले याप्रसंगी आदिवासी समाजाचे नेते सुखदेवराव गायकवाड यांनी आपले मनोगत व्यक्त करताना समाजाच्या व्यथा व विकासाच्या दृष्टीने विविध पावले उचलणे गरजेचे असल्याचे सांगितले याप्रसंगी सुदामराव मोरे यांनी प्रास्ताविक केले.

या मेळाव्यात काही पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आले. यामध्ये युवा तालुका अध्यक्ष म्हणून साई सुखदेव गायकवाड शहर महिला आघाडीच्या उपाध्यक्ष म्हणून सौ गंगाताई बर्डे सचिव पदी सौ वैशाली जिरे याप्रमाणे निवडी जाहीर करून त्यांना नियुक्तीपत्रे देण्यात आली.

## चारा टंचाईवर मात करण्यासाठी चारा साक्षरता अभियान : जिल्हाधिकारी

### सायाळ येथे नेपियर लागवड; निकृष्ट चारा सकस करण्याचे व मुरघास निर्मितीचे प्रात्यक्षिक



नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

संभाव्य दुष्काळी परिस्थितीत निर्माण होणाऱ्या चारा टंचाईवर प्रभावीपणे मात करण्यासाठी पशुसंवर्धन, कृषी, जलसंधारण, महसूल, पंचायत समिती तसेच संबंधित विभागांच्या समन्वयातून जिल्ह्यात 'चारा साक्षरता अभियान' व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सांगितले.

पशुधनासाठी वर्षभर सकस व पौष्टिक चारा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या अभियानांतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अंतर्गत जिल्हा जलसंधारण अधिकारी, नांदेड यांच्या सहकार्याने मौजे सायाळ, ता. लोहा येथे नाला बांधावरील तसेच गाळपेरा क्षेत्रात बहुवार्षिक नेपियर चारा पिकाची लागवड करण्यात आली. यावेळी पशुपालकांसाठी निकृष्ट चारा सकस करण्याची प्रक्रिया तसेच मुरघास निर्मितीचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक घेण्यात आले.

या उपक्रमास जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपविभागीय अधिकारी विलास नरुटे, जिल्हा जलसंधारण अधिकारी अनिल कांबळे, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाचे जिल्हा उपआयुक्त डॉ. सखाराम खुणे, सहाय्यक आयुक्त डॉ. प्रविणकुमार घुले, तहसीलदार विठ्ठल परळीकर, डॉ. अंकुश पाटील, डॉ. रंगनाथ पुरी, डॉ. दीप्ती चव्हाण, डॉ. उमेश धोंड, डॉ. बालाजी जाधव, भागवत परगे, बजरंग ढगे यांच्यासह पशुसंवर्धन, जलसंधारण, महसूल, कृषी व पंचायत समिती विभागांचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी संभाव्य दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर वैरण व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन केले. उपलब्ध वाळलेल्या व निकृष्ट चाऱ्यावर शास्त्रीय प्रक्रिया करून त्याची पौष्टिकता वाढविणे, कडबा कुट्टीचा वापर वाढविणे तसेच हिरव्या चाऱ्यापासून मुरघास तयार करून त्याची योग्य पद्धतीने साठवणूक करणे, यावर त्यांनी विशेष भर दिला.

जिल्ह्यातील उपलब्ध जलस्रोत, नाला बांध तसेच गाळपेरा क्षेत्रांचा चारा उत्पादनासाठी प्रभावी वापर करावा. बहुवार्षिक चारा पिकांच्या लागवडीला प्रोत्साहन देऊन भविष्यातील चारा टंचाईच्या परिस्थितीसाठी आतापासूनच नियोजन करावे, असे निर्देशही जिल्हाधिकारी कर्डिले यांनी दिले.

**शेतकरी, पशुपालकांना प्रत्यक्ष प्रशिक्षण**

'चारा साक्षरता अभियान'च्या माध्यमातून शेतकरी व पशुपालकांना चारा उत्पादन, चारा संवर्धन, मुरघास निर्मिती, कडबा कुट्टीचा वापर आणि निकृष्ट चाऱ्याचे सकस व पौष्टिक चाऱ्यात रूपांतर याबाबत प्रत्यक्ष प्रशिक्षण व मार्गदर्शन देण्यात येणार आहे. उपलब्ध साधनसामग्री व जलस्रोतांचा योग्य वापर करून पशुधनासाठी वर्षभर चारा उपलब्ध राहील, यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने नियोजन करावे, यावर अभियानात भर देण्यात येत आहे.

# आईच्या स्मरणार्थ दागिण्यातून १३ शाळांना शालेय साहित्य

श्रीगोंदा : (स. गांवकरी)



आईच्या निधनानंतर आईजवळ असणाऱ्या दागिण्यांचा मोह, स्वार्थ आणि लोभ मनामध्ये न ठेवता त्याच दाणिण्याच्या पैशातून गावातील सुमारे तेरा शाळांना ऑफिस टेबल,खुर्ची, कपाट, पंखे,कलर प्रिंटर, असा लाखांचा ऐवज घेऊन आईच्या स्मरणार्थ दान म्हणून भेट देवून समाजाप्रती आपले कर्तव्य पार पाडल्याने चव्हाण कुटुंबीयांच्या प्रेरणादायी उपक्रमाची चर्चा गावात आदराने सुरु झाली.

श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील रहिवासी माजी ग्रामपंचायत सदस्या श्रीमती हिराबाई रमेश चव्हाण यांचे दहा दिवसापूर्वी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. दि.4 रोजी दशक्रिया विधी पार पडला.त्यानंतर आईच्या अंगावर असणाऱ्या दागिण्यांची कुटुंबात चर्चा सुरु झाली. याचे काय करायचे हिराबाई यांना दोन मुलं, महादेव,गणेश व तीन विवाहित मुली जया,माया,आणि रेखा आहेत. दोघां भावांनी आईचे दागिने आठवण म्हणुन तिंनी बहिणींना घेण्यास सांगितले. परंतु आमच्या घरी आईच्या कृपा आशिर्वादाने भरपूर आहे. यातील एकही मनी आम्हाला नको असे तिघी बहिणींनी मनाचा मोठेपणा दाखवून भावांना सांगितले. हयात असताना हिराबाई आणि रमेशआण्णा यांचे समाजाप्रती योगदान मोठे आहे. प्रत्येक वेळी दोघां उभयतांनी शाळेतील गरजु गरिब कुटुंबातील मुलांना मदत करुण घडविले आहे. तो भूतकाळ आठवून पाचही भावंडांनी एकत्र बसून निर्णय घेतला. कि आईचे सर्व दागिने मोडून त्या पैशातून शाळेला मदत करायची मग शिक्षक मित्र रमेश कुसाळकर,विमा प्रतिनिधी बाळासाहेब धुमाळ यांच्या मदतीने जनता विद्यालय, कन्या विद्यालय, काष्टी जिल्हा परिषद, काष्टी स्टेशन,पुनर्वसन, चौधरी मळा, साईनगर, पाचपुतेवाडी, शिवछायानगर, संतवाडी, अहिल्यानगर, राहिंजवाडी,व गजानन वाडी, अश्या काष्टी गाव व परिसरातील आकरा जिल्हा परिषद शाळा व गावातील दोन माध्यमिक विद्यालय अश्या तेरा शाळांना ऑफिस टेबल, खुर्ची, कपाट, पंखे,कलर प्रिंटर सह शालेय साहित्य आईच्या स्मरणार्थ संबंधित शाळेच्या वर्ग शिक्षकांना देवून समाजाप्रती आपले योगदान देवून आईवडिलांच्या आठवणींना उजाळा दिला.

यावेळी वाटप कार्यक्रमाला शिक्षण विस्तार अधिकारी निळकंट बोरुडे,केंद्र प्रमुख भरत भवर,सेवानिवृत्त रयत सेवक निवृत्ती शेलार, संजय शिंदे, महादेव चव्हाण, गणेश चव्हाण, जया बाळासाहेब रणसिंग,माया नवनाथ दवने,रेखा गणेश थोरात, यांच्यासह चव्हाण कुटुंबांतील सर्व सदस्य, तसेच सर्व शाळेचे मुख्यध्यापक, शिक्षक मोठ्या संख्येने हजर होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)
कोकण विभागीय कार्यालय : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र, २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९